# माणूस

शनिवार । २९ नोव्हेंबर १९८० । एक रुपया


## साखरधोरणाचा फेरविचार

'उसाच्या जातीत व लागवडीत सुधारणा करण्यासाठी प्रांतिक व केंद्र सरकारने ऊस आणि साखरेवर भरमसाठ कर लादले आहेत. आज या करांपासून कोटचवधी रुपयांचे उत्पन्न सरकारला मिळते; पण त्याचा उपयोग छोटचा ऊस–शेतकऱ्याला व साखर–कारखान्याला फार थोडा होतो. म्हणून या करात बरीच मोठ्या प्रमाणात कपात झाली पाहिजे.

....ह्याचबरोबर आज साखरेच्या धंद्यात अनिष्ट व गलिच्छ राजकारणाने भाऊगर्दी केली आहे त्यालाही वेळीच पायबंद घातला पाहिजे'

पृष्ठ...९

### जनरल बेवूर म्हणतात....

'काबूलच्या खोऱ्याच्या प्रदेशाची सीमा पाकिस्तान नीटपणे सांभाळू शकला नाही तर पंजाबमार्गे भारतात कम्युनिस्टांचा शिरकाव होण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही.

....म्हणून आपला शत्रू कोण व त्याचं बळ नेमकं कशात आहे याचा हिशेब करून आपण संरक्षण–उत्पादनात गुंतवणूक केली पाहिजे.'

# सप्रेम नमस्कार

¤ नेहमीप्रमाणेच 'माणूस' दिवाळी अंक झपाटून टाकणारा आहे. 'योद्धा शेतकरी' हा श्री. परुळकर यांचा *मुलाखत–माहिती-वजा लेख* वाचून डोके सुन्न झाले व 'इंडिया'-तील नागरिक बनल्याबद्दल शरमही वाटली. वस्तुस्थिती स्पष्टपणे मांडल्यामुळे व ती खरी असल्याचे नेहमीच जाणवत असल्यामुळे कोडगेपणा वाटत होता; पण श्री. जोशीनी केलेली 'भारत'-'इंडिया'तील तफावतीची कारण-मीमासा वाचून धक्का बसला हे खरे.

इतर आंदोलनांप्रमाणेच शेतकरी संघटनेचे आंदोलन मोडण्याचे सर्व प्रयत्न चालू आहेत; परंतु २१ खासदारांनी कृषिमंत्र्याची घेतलेली भेट, सरकारचा दरवाढीबद्दल प्रयत्न, जॉर्ज फर्नांडिस आदी नेत्यांचा पाठिंबा *यावरूनच आंदोलन यशस्वी झाल्याचे दिसून येते-प्रत्यक्ष* भावाची घोषणा न झाली तरीही.

आपले संपादकीयही मननीय आहे. मागे किसान विशेषांकाचे वेळी आपण लिहिल्या-प्रमाणे गोपाळकृष्ण, दूधपदार्थाला भाव मिळत नाही व शहरी लुबाडणूक होते म्हणून गवळणीना मथुरेच्या बाजारास जाण्यापासून वाट अडवून परावृत्त करीत आहे.

शेतकरी संघटना खुर्चीपासून अलिप्त ठेवण्याचा निर्णय फारच योग्य आहे. त्यामुळे सर्व शेतमालाला उत्पादनावर आधारित किमत ठरविण्यास चांगली शक्ती उपलब्ध होईल व जयप्रकाशजींना अपेक्षित असलेली राजकारणापासून अलिप्त अशी दबावशक्ती निर्माण होईल,तसेच शेतमालाला उत्पादनावर *आधारित भाव मिळाल्यामुळे ग्रामीण भागात* गुतवणूक आपोआपच वाढेल. त्यासाठी कर-सवलतीच्या योजनाचे आमिष दाखवून टाटा-बिर्लांना खेडय[illegible] कारखाने काढण्याचे आवाहन कर[illegible]र नाही.

याच अंकात श्री. पांडू खाडे याच्या मुलाखतीत असे आले आहे की, एका रेसमध्ये दिवसात एक ते दीड कोटी रुपयांची उला-ढाल होते. याविरुद्धही भारतीय नागरिकांनी 'इंडिया'शी लढायला हवे. १९८२ मध्ये 'इंडिया'त आशियाई स्पर्धा भरणार आहेत. त्याचा खर्च तीनशे कोटी रुपये येईल असा अंदाज आहे, त्याबद्दल ज्याना भारतीयांबद्दल *सहानुभूती आहे, आस्था आहे त्यानी निषेध* नोंदवायला हवा.

सध्या शेतकरी संघटना विविध मार्गांनी आंदोलन छेडते आहे. त्यामध्ये शेतसारा न भरणे, पाणीपट्टी न भरणे इत्यादी प्रत्यक्ष सरकारविरुद्ध असहकार करणे शक्य होईल काय याचाही विचार व्हावा ही विनंती.

श्री. शरद जोशी, प्रयोगपरिवाराचे प्रा. श्री. अ. दाभोळकर व आपली ग्रामायन संस्था याचे एकत्रित येऊन मार्गदर्शन झाल्यास एक मोठी शक्ती तयार होईल की जिच्या-मार्फत क्रांती होऊ शकेल, असे वाटते.

अंकातील 'अन्वर सलीम' ही कादं-बरीही रोमाचकारी आहे. ज्याना स्वातंत्र्याची किमत भाकरीपेक्षा कमी वाटते त्या आपल्या राज्यकर्त्यांकडून असेच अफगाणिस्तान-सारखे घडू शकेल अशी भीती वाटते.

इतर लेखही वाचनीय आहेतच. माझ्याकडे 'माणूस' दिवाळी अंकासाठी ओळखीच्या सर्वांची मागणी आहे.

२० नोव्हेंबर ८० **सौ. मृणालिनी दाते,**
सोलापूर

¤ आपल्या दिवाळी अंकाने अक्षरशः थक्क करून सोडलं आहे! दिवाळी अंकाच्या साच्यांमध्ये न बसणारा आणि म्हणूनच वेगळा व प्रशंसनीय असाच 'माणूस'चा यंदाचा अंक आहे.

खरोखरच चहाच्या घुटक्याबरोबर अत्यंत कोरडेपणाने अथवा केवळ कुतूहलापोटी रोज सकाळी शेतकरी आदोलनाचा वृत्तात वाच-णाऱ्या आम्हा 'इंडिया' वाल्याना 'योद्धा शेतकरी' गदगदा हलवून जातो. नव्हे, या प्रश्नाचा वेगळ्या संदर्भात विचार करायला लावतो. लॉरेन्स व काफ्का यांच्यासारख्या हिमनगांचे दर्शनही सौ. ललिता बर्वे आणि प्रा. शिरीष सहस्रबुद्धे यांनी प्रभावीपणानं घडवलं आहे. आर्थिक, राजकीय व सामाजिक *अस्थैर्याने गाजलेल्या, केंद्र हरवलेल्या आजच्या* माणसाचे या दोघाच्या साहित्य-विश्वाशी अतिशय जवळचे नाते आहे. यांत्रिक युगा-


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : विसावे**

**अंक : सव्वीसावा**

**२९ नोव्हेंबर १९८०**

**किमत : एक रुपया**



संपादक
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस,**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

तील विदारक सत्ये आणि आधुनिक जगातील एकदर absurdity ची नव्याने जाणीव देणाऱ्या या कलाकृती आणि त्याच्या निर्मात्याची ही ओळख अत्यत जिव्हाळ्याची वाटली अशीच लेखमाला पुढे चालू राहिली तर सामान्य वाचकाला पाश्चात्य वाङमयातील आधुनिक प्रवाहाची बदलत्या मूल्याच्या सदर्भात ओळख होईल. शिवाय अभ्यासूनाही फायदा होईल.

बरेच दिवस सौ प्रतिभा रानडे याची 'माणूस'मधील अनुपस्थिती जाणवत होती. ती उणीव 'अन्वर सलीम' ने भरून काढली. अफगाणिस्तानातील बदलत्या राजकीय प्रवाहामुळे दुभंगत गेलेल्या समाजाच्या दर्शनाने मन विषण्ण होऊन जाते. देश सपन्न करण्याची अन्वरची स्वप्ने रणगाडे तुडवतात तेव्हा काही दिवसानी भारतातही अशाच उद्ध्वस्त आदर्शवादी युवकाची राग पाहयला मिळणार नाही ना, या विचाराने थरकाप उडतो. लेखिकेचे खास अभिनंदन !

'माणूस' मधील नवनव्या लेखमालाची आतुरतेने वाट पहात आहे

१८ नोव्हेंबर, ८० इंद्रायणी शहा, निपाणी

पुणे वार्ता

# शस्त्र-स्पर्धेपेक्षा शत्रूची पारख हवी

## —जनरल बेवूर

२२ नोव्हेंबर. टिळक स्मारक मदिराचं सभागृह. प्रवेशद्वारावरच 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' ही सोनेरी रंगातली मोठी अक्षरं डोळ्यासमोर आली. आतमध्ये लोकमान्याचा उत्कृष्ट पुतळा त्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले विविध महत्वाचे प्रसग चितारलेले. या सर्व वातावरणाला साजेसच भाषण आज या ठिकाणी होणार होतं भारताचे माजी सरसेनापती गोपाळराव बेवूर 'पश्चिम सीमेच्या संरक्षणाच्या समस्या' या विषयावर बोलणार होते. त्याच्याबरोबर होते लेफ्टनंट कर्नल म ग. अभ्यकर आणि सभेचं अध्यक्षस्थान भारताचे माजी राजदूत बॅरिस्टर अप्पासाहेब पत यानी भूषविलं होतं.

पंडित हृदयनाथ कुंझरू सरक्षण केंद्रातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात भारताच्या पश्चिम सीमेचा नेकाशाही श्रोत्यासमोर ठेवलेला होता. या सीमेबरोबरच सबंध भारत—पाकिस्तान सीमेची वैशिष्टचे स्पष्ट करताना जनरल बेवूर म्हणाले, "ही सीमा भौगोलिक नाही. भारतवर्षाची म्हणजेच भारतीय उपखंडाची भौगोलिक सीमा हिंदुकुश पर्वत, सुलेमान पर्वत आणि हिमालय ही आहे. आता त्या प्रदेशात इतरही अनेक राष्ट्र निर्माण झाली आहेत त्यामुळे भारत-पाकिस्तान सीमा ही भौगोलिकतेपेक्षाही धार्मिक तत्त्वावर ठरवली गेली आहे, अस मला वाटतं.

"या सीमेवर काश्मीरचा डोंगराळ भाग, पंजाब—राजस्थानचं मैदान तसच राजस्थान व कच्छाचं रण हा प्रदेश आहे. मैदानी प्रदेशात हालचाली करताना पायदळाला हवाई दलाचं संरक्षण असणं आवश्यक असतं. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात पाकिस्तान हे तत्त्व अमलात आणू शकला नाही व त्यामुळे त्याच्या सैन्याची फार बिकट अवस्था झाली. जम्मू—काश्मीरसारख्या प्रदेशात सीमाचं संरक्षण करणं ही एक वेगळीच समस्या असते. काश्मीरच्या घनदाट जगलामध्ये व बर्फाळ प्रदेशात जनावराचंही सहाय्य मोठ्या प्रमाणावर घ्याव लागत. त्यामुळे टेहळणी नाकी आणि लष्करी ठाण्यावरच्या जवानाना दारूगोळा व रसद पोचवण जास्त त्रासाच असतं. अशा तऱ्हेने दररोज चाळीस ते शभर टन धान्य—दारूगोळा इत्यादी पोचवण ट्रकपेक्षा रेल्वेने अधिक सुलभ व कमी खर्चाच असतं, पण त्याला निसर्गाचीही साथ लागते

"अफगाणिस्तानातली रशियन सैन्याची उपस्थितीही आपण लक्षात घेतली पाहिजे; कारण काबूलचं खोर शत्रूच्या ताब्यात असू नये असा दृष्टिकोन ब्रिटिशाशी ठेवला होता व भारताच्या सरक्षणाच्या दृष्टीने तो योग्यही होता पण आता हा प्रदेश म्हणजे पाकिस्तानच्या सरक्षणाचा भाग आहे पाकिस्तान ही सीमा नीटपणे साभाळू शकला नाही तर पजाबमार्गे भारतात कम्युनिस्टाचा शिरकाव होण्याचीही शक्यता नाकारता येणार नाही. म्हणून तुर्कस्तान, इराण, अफगाणिस्तान या भागात बड्या शक्तीचा हस्तक्षेप भारताच्या पश्चिम सीमेच्या दृष्टीने धोकादायक आहे."

पाकिस्तानच्या शस्त्र-सामर्थ्याविषयी बोलताना जनरल बेवूर म्हणाले, "सरक्षणाच्या दृष्टीने आपल्याला सतत जागृत ठेवणारा देश असे पाकिस्तानचे वर्णन करता येईल, पण औद्योगिक व तात्रिकदृष्ट्या पाकिस्तानची प्रगती अजून मर्यादित आहे तिथे मध्यम क्षमतेच्या रायफली व बदुका यापलिकडे फारस काही तयार होत नाही. त्यामुळे शस्त्रास्त्रासाठी पाकिस्तानला परकीयांवरच फार मोठ्या प्रमाणात अवलबून राहावं लागत. अस जरी असलं तरी पाकिस्तानच्या अस्तित्वाची दखल आपण घेतली पाहिजे, कारण अमेरिका त्याला फार मोठ्या प्रमाणात शस्त्र-करते. ब्रिटिशानी जिथे सामाज्र केलं त्या सव देशात आपल वर्चस्व निर्माण करण्याचं अमेरिकेचं धोरण यामागे दिसतं चीनकडूनही पाकिस्तानला शस्त्रास्त्रं मिळतात; पण तांत्रिकदृष्ट्या चीन आपल्यापेक्षा मागासलेला आहे. शिवाय नव्याने येणाऱ्या शस्त्रास्त्राना तोड देण्याइतक आपलं नौदल आणि हवाईदल समर्थ आहे. त्यामुळे आपला शत्रू कोण व त्याचं सामर्थ्य किती याचा हिशेब करून आपण संरक्षण-उत्पादनात गुतवणूक केली पाहिजे. अफगाणिस्तानात रशियन सैन्य घुसल्यानेही पाकिस्तानला नवी डोकेदुखी निर्माण झाली आहे हे सर्व लक्षात घेतलं तर मी असं म्हणेन की, भारताने अत्याधुनिक महागडी शस्त्रास्त्र निर्माण करणं किंवा खरेदी करण्यामध्ये आपले श्रम आणि पैसा घालवण्यापेक्षा सध्या वापरत असलेल्या शस्त्रास्त्राचे

सुटे भाग निर्माण करण्यावर जास्त भर दिला पाहिजे.'

भाषणाचे मुद्दे समोर ठेवून जनरल वेवूर यांनी विषयाचं चागलं विवेचन केल, पण आधी मुद्दे स्वत शीच वाचून नंतर त्याचं स्पष्टीकरण करण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे भाषणाचा ओघ सतत खंडित होत होता तसंच 'भारताच्या पश्चिम सीमेच्या समस्या' असा मर्यादित विषय असताना त्यानी सबध भारत-पाकिस्तान सीमा विचारात घेऊन विषयाची व्याप्ती वाढवली. यामुळे श्रोत्यांना भारत-पाकिस्तान सीमेच्या समस्याची अधिक व्यापक पातळीवर जाणीव झाली हे खरं; पण त्यामुळे पश्चिम सीमेच्या अडचणीवर –ज्यामध्ये मोठा सागरी पट्टा येतो–जेवढे लक्ष केंद्रित होणे आवश्यक होतं तेवढं ते झालं नाही.

याच वेळी लेफ्टनट कर्नल म. ग. अभ्यंकर आणि जनरल वेवूर यांच्यामध्ये छोटीशी तात्विक चकमकही घडली. 'अणुबाँबसाठी लागणारे समृद्ध युरेनियम व इतर साहित्य घेऊन काही जहाजं येत्या दोन-तीन महिन्यात पाकिस्तानला पोचतील. त्यामुळे 'इस्लामिक बाँब' ही एक कपोकल्पित कथा राहिली नसून ते एक भयंकर सत्य आहे,' असं लेफ्टनंट कर्नल अभ्यंकर यांनी आपल्या भाषणात सागितलं व त्याबद्दल तीव्र चिंताही व्यक्त केली. श्री. अभ्यंकर पुढे म्हणाले, 'भारत हा पाकिस्तानापेक्षा प्रत्येक बाबतीत दहा पटीनी मोठा आहे. त्यामुळे या दोन देशाची तुलनाच होऊ शकत नाही. म्हणून भारताशी सैन्याच्या स्पर्धेत उतरण्यापेक्षा पाकिस्ताननं अनुबाँब बनवावा, अशी पाकिस्तानचे माजी पतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो याची भूमिका होती. त्यामुळेच एकीकडे सिमला-करार करत असतानाच भुट्टोसाहेब अणुबाँबच्याही तयारीला लागले होते.

'अब्दुल कादिरखान नावाच्या एका पकिस्तानी शास्त्रज्ञाला याच हेतूने फ्रान्समध्ये अणुबाँब निर्मितीचं प्रशिक्षण घेण्यासाठी गुप्तपणे पाठवण्यात आल. तिथे त्याने एका डच बाईशी लग्न करून अणुतंत्राचं ज्ञान इंग्रजीमध्ये भाषातरित करून घेतलं.

'आता अण्वस्त्राना लागणारी यत्रे तयार करण्याचे छोटे छोटे कारखाने इस्लामाबादजवळच्या एका खेड्यात पाकिस्तानने उभारले आहेत. पाकची सध्याच एवढी तयारी झाली आहे की तो एक मेगाटन शक्तीचे सहा बाँब आज निर्माण करू शकतो. दुसऱ्या महायुद्धात हिरोशिमावर टाकण्यात आलेला बाँब एक किलोटनाचा होता व असे एक हजार किलोटन म्हणजे एक मेगाटन शक्तीचा बाँब तयार होतो, हे जर लक्षात घेतलं तर पाकिस्तानच्या भयकर अण्वस्त्रक्षमतेची कल्पना आपल्याला येऊ शकेल

'अरब देशानाही इस्त्रायलविरुद्ध लढण्यासाठी अणुबाँब हवा आहे. पण इस्त्रायलच्या भीतीपोटी तो अरब देशातच बनवण्याचं त्याचं धैर्य होत नाही. म्हणून कर्नल गडाफी व अन्य मुस्लिम राष्ट्रानी अणुबाँब बनवण्यासाठी पाकिस्तानला कोट्यवधी डॉलर्सची मदत केली आहे. हे सर्व लक्षात घेता आपण फक्त 'शाततेसाठीच अणुशक्ती' हे धोरण कायम ठेवावे का, यावर राष्ट्रीय स्वरूपाची चर्चा घडवून आणणं आज आवश्यक आहे.'

लेफ्टनट कर्नल अभ्यकरांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना जनरल वेवूर म्हणाले, 'या 'इस्लामिक बाँब' मुळे आपण खरोखरच फार घाबरून गेलो आहोत, असं दिसतं. पण प्रत्यक्षात असं दिसतं की आदेश दिल्यास आपले शास्त्रज्ञ चोवीस तासात तशा स्वरूपाचा बाँब बनवू शकतील. स्वत: डॉ. होमी भाभा यानीच हे स्पष्ट केलं होतं. तेव्हा पाकिस्तानच्या प्रयत्नापेक्षा आपल्या देशातल्या शास्त्रज्ञाच्या बुद्धिमत्तेवर जास्त विश्वास ठेवायला हरकत नाही.'

— प्रतिनिधी

# पोलंड–गुंतागुंतीच्या रस्सीखेचीला सुरुवात

पोलंडवरील १३ सप्टेंबरच्या 'माणूस'च्या लेखामध्ये तेथील अस्वस्थता मार्क्सवादाला अनुसरूनच आहे असे मी लिहिले होते. याचा अधिक विस्ताराने विचार करायला हवा.

एकदा वर्गविग्रह संपला किंवहुना वर्गरचनाच संपली की, रामराज्य अवतरते हा निकष मार्क्सच्या तत्त्वप्रणालीत अभिप्रेत आहे असे मला वाटत नाही. समाजाची गतिशीलता मार्क्सने नाकारलेली नाही. खाजगी मालमत्ता हा समाजाच्या उन्नयनातील एकमेव अडथळा नसून मोठ्यात मोठा अडथळा आहे. त्यानतर वर्गपुनर्रचना अस्तित्वात येणे अपरिहार्य आहे. या दृष्टीने आजच्या जगातील रशिया ते चीन या दोन टोकांच्या कम्युनिस्ट राजवटीचा (आणि त्या Spectrum मधील उर्वरित कम्युनिस्ट राजवटीचा) अभ्यास करायला हवा

सध्या प्रश्न पोलंडपुरता जरी मर्यादित ठेवला तरी पोलंड हे 'classical communist State' आहे असे म्हणता येणार नाही. तेथील बहुमंख्य जनतेला आपल्या धर्माप्रमाणे (रोमन कॅथलिक) वागण्याची मुभा आहे किंवा खाजगी शेतीही मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहे या गोष्टी तर सोडाच, आधुनिक पोलंडचा जन्मच मुळात अनैसर्गिक आहे आणि त्यात तेथील बऱ्याचशा प्रश्नाचा उगम आहे.

दुसऱ्या महायुद्धानतर जर्मनी आणि रशियाने सोईस्करपणे पोलंडचे तुकडे पाडून प्रथम तत्कालिन घडी विस्काटली; नंतर वॉर्सा पॅक्ट झाला. वॉर्सा पॅक्टच्या वेळेला त्यात समाविष्ट असणाऱ्या इतर देशापेक्षा, विशेषत पूर्व जर्मनीपेक्षा पोलड खूपच मागासलेला होता व अजूनही आहे. लेनिनने ज्याप्रमाणे व्हिक्टोरियातून जाऊन आम्ही देश काबीज केला अशी घोषणा केली, त्याप्रमाणे पोलडमध्ये समा-

पृष्ठ २४ वर

# शरद जोशी

## एक प्रश्न की उत्तर ?

चंद्रशेखर

अमेरिकेचे सुप्रसिद्ध साप्ताहिक 'टाइम' हे दरवर्षी 'मॅन ऑफ् द इयर' म्हणून एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची निवड करीत असते. जागतिक घडामोडीवर सर्वांत जास्त प्रभाव पाडणारी व्यक्ती 'मॅन ऑफ् द् इयर' या विशेषणास पात्र होत असते महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास १९८० या सालासाठी श्री. शरद जोशी यांची निवड करावी लागेल. हे नाव प्रथम प्रकाशामध्ये आले ते मार्च '८० च्या सुमारास. त्यानंतर शरद जोशी हे व्यक्तिमत्त्व सतत गाजत राहिले आहे तेदेखील एकाच सदर्भात– शेतकऱ्याच्या प्रश्नाच्या ! आता परिस्थिती अशी आहे, शेतकऱ्याच्या प्रश्नाचा विचार शरद जोशी या व्यक्तीला वगळून करता येणार नाही. 'शेतकरी नेते' हे बिरुद जोशीना, जनतेने, वृत्तपत्रानी व रेडिओने उत्स्फूर्तपणे बहाल केले आहे.

शेतकऱ्याचे नेते शरद जोशी यानी या वर्षी तरी मर्यादित उद्दिष्ट समोर ठेवलेले आहे. ते म्हणजे महत्त्वाच्या शेतमालाचे भाव बाधून देण्यास सरकारला भाग पाडणे. मर्यादित उद्दिष्टाच्या साध्यासाठी जोशीनी कार्यक्रमही मर्यादितच हाती घेतला आहे. हे सर्व ठरविताना त्याना मार्च '८० मधील 'चाकण सत्याग्रहा'चा बराच उपयोग होत आहे. त्या वेळच्या उणीवा टाळण्याचा त्याचा प्रयत्न दिसतो. किंबहुना सध्याच्या व्यापक चळवळीची रगीत तालीम म्हणूनही चाकण सत्याग्रहाकडे पहाता येते. चाकणला मार्च '८० मध्ये रस्ता अडविल्यावर त्या चळवळीचे उद्दिष्ट मर्यादितपणे साध्य झाले– कांद्याचा भाव बाधून मिळाला, शेतकरीवर्गाला एकत्रित येऊन काही आदोलन करण्याची दीक्षा मिळाली व शरद जोशी 'शेतकऱ्याचे नेते' ठरले.

नोव्हेंबर '८० मध्ये सुरू झालेल्या चळवळीत चाकण सत्याग्रहाची सर्व वैशिष्ट्ये कायमच आहेत. म्हणजे असे की मागणी तीच, दबाव आणण्याचा मार्ग तोच आणि नेतृत्वही तेच ! तरीसुद्धा ही चळवळ अधिक प्रभावी ठरण्यासाठी तीमध्ये काही डावपेचात्मक बदल करण्यात आले. 'रस्ता रोको' हे आदोलन नाशिक जिल्ह्यातच का घेतले ? इतरत्र का नाही ? या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी भारताच्या नकाशात नाशिक जिल्ह्याकडे नजर टाकावी. संपूर्ण उत्तर भारताला विविध आवश्यक वस्तूचा पुरवठा करण्यासाठी रेल्वे व रस्ता या जिल्ह्यातून जातो. या अर्थाने नासिक हा जिल्हा उत्तर भारताचे 'नाक' आहे. हे नाक दाबले की सरकारचे तोड उघडेल असा आदोलन करणाराचा अंदाज आहे व तो बहुताशी बरोबर आहे

नाशिकची चळवळ आणखी एका अर्थानेही मर्यादित ठेवण्यात आली आहे 'ऊस व कादा याचे खरेदीभाव बाधून द्या !' एवढ्या एका मागणीचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे शेतीव्यवसायामधून सोळाशे प्रकारच्या जिनसाची निर्मिती होत असते. त्यापैकी किमान शंभर जिनसाचे खरेदीभाव बाधून दिले पाहिजेत अशी शरद जोशीची जाहीर भूमिका आहे; पण सध्या तातडीची मागणी म्हणून उसाचे खरेदीभाव बाधून घेण्याचे उद्दिष्ट चळवळीसमोर ठेवण्यात आलेले आहे. याचे कारण असे की समेटाच्या बोलण्याचे वेळी बारेमाप चर्चा न होता एका विशिष्ट मागणीवरच चर्चा व्हावी; मग कांद्याच्या भावाचा आग्रह कशासाठी ? तर शेतकऱ्याची मूळ 'चाकण चळवळ' त्याच मुद्द्यावर सुरू झाली म्हणून कोणत्याही पुढील चळवळीत कांद्याचा समावेश राहणारच

शरद जोशीप्रणीत 'नासिक' चळवळीचे उद्दिष्ट आपण पाहिले व चळवळीचे मार्गही पाहिले. उद्दिष्ट व मार्ग याचा विचार करताना काही महत्त्वाचे प्रश्न डोळ्यासमोर उभे राहतात

(१) शेतमालाला खरेदीभाव बाधून देणं सयुक्तिक आहे काय ?

(२) त्याचप्रमाणे असे करणे व्यवहार्य आहे काय ?

(३) 'रस्ता रोको' या मार्गाने मूळ उद्दिष्ट साध्य होईल काय ?

(४) तसे ते साध्य होऊ शकले तरी तो मार्ग चोखाळणे समर्थनीय आहे काय ?

(५) या चळवळीतून कोणत्या प्रकारचे नेतृत्व उदयास येत आहे ? शरद जोशीचे नेतृत्व टिकाऊ व यशस्वी ठरेल काय ?

(६) शेती व उद्योग याच्यातील आर्थिक समतोल या चळवळीने साधला जाईल काय ?

या प्रश्नाची उत्तरे अर्थातच कोणत्याही पुस्तकात मिळणार नाहीत. 'नासिक शेतकरी चळवळ' जसजशी पुढे जाईल तसतशी ही प्रश्नचिन्हे अधिकाधिक मोठी होत जातील. कोणताही प्रश्न मोठा व तीव्र झाल्याखेरीज त्यात लक्ष घालावयाचे नाही, ही सरकारची सवय ज्ञात असल्याने चळवळ अधिकाधिक फोफावत जाणार हे स्पष्ट दिसते. सध्याच नासिक चळवळीचे लोण विदर्भ व गुजरात येथे पसरले आहे प्रत्येक ठिकाणी शरद जोशी जाऊ शकत नाहीत. त्यामुळे याच चळवळीत दुय्यम व स्थानिक नेतृत्व कसे तयार होते यावर चळवळीचे भवितव्य ठरणार आहे सध्या हे आदोलन केवळ 'रस्ता रोको' अशा स्वरूपाचे असल्याने दिसावयास सोपे भासते, पण पुढे हे आदोलन अधिक तीव्र, विविध पातळ्यावर लढवावे लागणार आहे.

आतापर्यंत शरद जोशी हे आदोलन कसे चालवीत आहेत ? त्यानी आतापर्यंत फार मोठी अशी चूक केलेली नाही असे म्हणता येईल रस्ता अडवण्याच्या कार्यक्रमाला आम जनतेची सहानुभूती नाही हे त्यानी लवकर ओळखले. म्हणूनच मधूनमधून ते वाहतूक खुली करण्याचा आदेश देतात. मात्र हे करताना आपल्या अनुयायाचे मनोधैर्य कमी होणार नाही याची ते काळजी घेत आहेत. 'आमच्या सत्याग्रहाना ३६ तास सुट्टी' अशी भूमिका घेऊन ते वाहतूक खुली करतात पण रस्ता केव्हाही, कोठेही अडविण्याचा आपला अधिकार त्यानी सोडून दिलेला नाही. तुबलेली रहदारी मोकळी केल्याने सुटणारे जे असख्य निश्वास असतील ते आदोलनाच्याच बाजूने असतील. शरद जोशी या मूक-पाठिंब्याचे मोल ओळखून आहेत.

आणखी एक पाठिंबा जोशीना वाजत–गर्जत मिळतो आहे तो म्हणजे राजकीय पक्षाचा– अर्थात विरोधी पक्षाचा. आपला पाठिंबा जोशीनी घ्यावा म्हणून सारे विरोधी नेते नासिकला मुक्काम ठोकीत आहेत, पण शरद जोशींनी हा पाठिंबा निग्रहपूर्वक नाकारला आहे. तसे केले नसते तर आदोलन आहे त्या पद्धतीने चालविता आले नसते राजकीय पक्षानी व पुढाऱ्यानी गेल्या ३३ वर्षांत काय केले असा प्रश्न शरद जोशी प्रत्येक ठिकाणी विचारतात याचा अर्थ असा की 'नासिक' शेतकरी आदोलन त्याना राजकारणाच्या दलदलीत फसू द्यायचे नाही.

*शरद जोशी राजकारणापासून किती काळ अलिप्त राहू शकतील ?*

या व आधीच्या सहा प्रश्नाची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न सर्वानीच केला पाहिजे. ☐

औरंगाबाद वार्ता । भालचंद्र जोशी

# दोन हजार विणकरांची उपासमारी

मराठवाडा वस्त्रमहामंडळाचे सुमारे २३०० यंत्रमाग सध्या जवळजवळ पूर्णपणे बंद आहेत. अर्थात ही वीज–मंडळाची करामत नाही-एरवी हल्ली बऱ्याच वेळा वीजमंडळ या स्वरूपाचं श्रेय घेत असलं तरी हे यत्रमाग बद पडायच कारण अगदी सोपं आणि सरळ आहे–यंत्रमागासाठी सूत खरेदी करण्यासाठी महामंडळाकडे पैसेच नाहीत ! त्यामुळे या यंत्रमागावर अवलंबून असलेल्या ४८ सहकारी सोसायटया आणि त्यांचे सुमारे २ हजार विणकर–सदस्य हे सध्या उपासमारीच्या खाईत लोटले गेले आहेत. महिन्यातून जेमतेम ८।१० दिवसही काम त्याना सध्या मिळू शकत नाही अशी शोचनीय अवस्था झाली आहे. मार्च १९७९ पासूनच अडचणीना प्रारंभ झाला आणि आता हा फारच गंभीर प्रश्न बनला आहे. गेले तीन महिने विणकराच्या संघटनेनं विविध प्रकारानी आपल्या अडचणीना तोंड फोडायचा प्रयत्न केला. उपोषणं झाली, निवेदनं पाठवून झाली, अगदी अलीकडे तर विणकरांच्या नेत्यानी मंत्र्याचीही भेट घेतली.

या सगळया गोंधळामागची पार्श्वभूमी तरी काय आहे ? मराठवाडा विकास महामडळानं १९७० साली हा यत्रमाग–प्रकल्प मराठवाडयात सुरू करायचा निर्णय घेतला. अशोक मेहता समितीनं यंत्रमाग–उद्योगा–सबधी केलेल्या शिफारशीवर आधारित हा प्रकल्प उभा करायचं ठरविलं. विणाईची छोटी छोटी केन्द्रं असावीत, त्याना बँका आणि इतर सस्थानी पैसा पुरवावा असं समितीनं सुचवलं होतं मराठवाडयात औरंगाबाद (चिकलठाणा), जालना, नांदेड, वसमतनगर, मानवत, लातूर, बीड, परळी आणि वडवणी अशा नऊ ठिकाणी ही केन्द्रं उभारण्यात आली असून नादेड इथ सुतावर आणि विणलेल्या कापडावर प्रक्रिया करायचं एक मोठ केन्द्र निर्माण करण्यात आलं. या प्रत्येक केन्द्रात यंत्रमागाच्या शेडस आणि विणकराना राहण्यासाठी घरं आहेत. मराठवाडा वस्त्रमहामंडळातर्फे (टेक्स्कॉम) प्रत्येक केन्द्राला बीमचा (म्हणजे प्रक्रिया केलेल्या सुताचा) पुरवठा केला जातो आणि विणलेलं कापड, त्यावर प्रक्रिया करून महामंडळातर्फे विकण्यात येतं.

या प्रकल्पासाठी सुमारे साडेसहा कोटी रुपयाची गुतवणूक करण्यात आली आहे अशोक मेहता समितीनं आपल्या अहवालात म्हटलं आहे की देशात विणकराचं दरमहा उत्पन्न १२० रु. आहे. या प्रकल्पातील विणकरांना सुरुवातीची पाच वर्षं दरमहा १५० रु. त्यानंतर काही वर्षं दरमहा २१५ रु. आणि नंतर त्याहूनही जास्त पैसे मिळावेत अशी अपेक्षा होती. याशिवाय त्याना राहण्यासाठी घर, वीज आणि पाणी मोफत असेल. ४८ सोसायटयानी प्रकल्पाच्या सुरुवातीला जे कर्ज घेतलं होतं ते सुमारे १२ वर्षांत परत फेडलं जाईल आणि या सोसायटया आणि पर्यायानं त्यांचे विणकर–सदस्य हे या यत्रमागाचे मालक होतील अशी अपेक्षा होती. अर्थात प्रत्यक्षात मात्र विणकरावरचा कर्जाचा बोजा वाढलेलाच आहे आणि सध्या तर त्याना कामही मिळेनासं झालं आहे. प्रत्येक विणकरावर सुरुवातीला १८ हजार रुपये कर्ज होतं आता ते वाढत वाढत दुप्पट झालं आहे.

विणकराच्या सघटनेनं मुख्यमंत्र्यांना जे निवेदन दिलं आहे त्यात एक मुद्दा महत्त्वाचा आहे. तो असा की मराठवाडा वस्त्र महामडळानं प्रत्येक सोसायटीच्या नावावर ५।५ लाखाचं कर्ज घेतलं पण हा पैसा खेळतं भाडवल म्हणून न वापरता तो इतरत्र वापरून टाकला. त्यामुळे आज महामंडळाकडे सूत खरेदी करायला पैसा नाही ! विणकराचे नेते ॲड. व्ही. डी. देशपांडे यांनीही या मुद्दयावर भर दिला. मी याबाबत महामंडळाचे एक अधिकारी श्री. कॅस्टेलिनो याना विचारलं तेव्हा त्यानी सागितलं की, फक्त ३६ सोसायटयाच्या नावावर हे कर्ज घेण्यात आलं आहे आणि तेसुद्धा प्रत्येकी ५ लाख नसून पावणेचार ते चार लाखापर्यंत आहे. श्री. कॅस्टेलिनो यांचं म्हणणं असं की पैशाची निकडच एवढी मोठी होती आणि आहे की ही रक्कम फारशी उपयोगी पडली नाही. एक्साइज कर चुकवण्यासाठी प्रत्येक सोसायटी स्वत. सूत खरेदी करते आणि महामंडळाकडून त्यावर प्रक्रिया करून घेते असं दाखवण्यात आलं. या खरेदीसाठी प्रत्येक सोसायटीच्या नावावर महामंडळानं कर्ज घेतलं असं त्यानी सागितलं.

श्री. देशपांडे याचा आणखी एक मुद्दा असा की सध्या सर्वच्या सर्व नऊ केंद्राना फक्त नादेड इथूनच बीमचा पुरवठा होतो, त्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढतो. त्याऐवजी औरंगाबाद आणि जालना इथली केंद्र औरंगाबाद इथल्या देवगिरी कापडगिरणीला जोडली आणि लातूर, बीड आणि वडवणी इथली केंद्रं सोलापूर इथल्या नरसिंग गिरजी कापडगिरणीला जोडली तर सूत-वाहतुकीवर होणाऱ्या खर्चात बचत होऊ शकेल; पण अडचण अशी आहे की देवगिरी कापडगिरणीकडे जादा बीम तयार करायची क्षमता नाही. शिवाय श्री. कॅस्टेलिनो याच्या म्हणण्याप्रमाणे त्यामुळे होणारी बचत ही फार मोठया प्रमाणावर होणार नाही. बीमचा पुरवठा करण्यासाठी नादेडप्रमाणेच औरंगाबाद इथंही एक केंद्र स्थापन करण्यात यावं असं प्रकल्प-अहवालात म्हटलं होतं; पण प्रत्यक्षात मात्र फक्त नादेड इथच ते केंद्र आहे.

या यत्रमागासाठी मराठवाडयातल्या स्थानिक सहकारी सूतगिरण्याकडून सूत खरेदी करण्यात येईल असही प्राथमिक अहवालात म्हटलं होतं; पण प्रत्यक्षात मात्र ते मुंबईहून खरेदी करण्यात येत आहे. या सुताच्या वाहतुकीचाही खर्च वाचवता येईल असं ॲड. देशपाडे याचं म्हणण. यावर मराठवाडा वस्त्र महामडळाचं स्पष्टीकरण असं की मराठवाडयातल्या सूतगिरण्यामधल्या सुताचा दर्जा चागला नसतो, त्यामुळे बाहेरून सूत खरेदी करावं लागतं.

आणखी एक गोष्ट म्हणजे नादेड इथलं प्रक्रिया-गृह हे कोळशाभट्टीवर आधारित असाव असं प्राथमिक अहवालात म्हटलं आहे.

नांदेडजवळ कोळशाचा साठा असल्यामुळे प्रक्रिया-गृहाला कोळशाचा नियमित आणि पुरेसा पुरवठा होईल असही अहवालात नमूद करण्यात आल आहे प्रत्यक्षात मात्र तेलावर चालणाऱ्या भट्टचा उभारण्यात आल्या आहेत आणि आता मुबईहून नुसत हे तेल आणण्यासाठीच दरमहा २ लाख रुपये खर्च होत आहेत ! तेलाची वाढती किमत वेगळीच ! इतके दिवस निदान रेल्वेन तरी त्याची वाहतूक करता येत होती; पण आता रेल्वेच्या सर्व वॅगन्स वीज-निर्मितीकेंद्राकरता राखून ठेवण्यात आल्यामुळे हे तेल टॅकर्समधून आणावं लागत आहे आता नादेड इथल्या प्रक्रिया-गृहात तेलभट्टीऐवजी कोळशावर आधारित भट्टचा उभरायचं काम सुरू झाल असून ते डिसेबरमध्ये पूर्ण होईल. वास्तविक मुळात अहवालात ठरल्याप्रमाणे सुरुवातीलाच कोळशावर आधारित भट्टचा उभारायला हव्या होत्या. शिवाय तेलाच्या किमतीचा प्रश्न काही आत्ताच निर्माण झालेला नाही. इतकी वर्षे ही हालचाल का झाली नाही ? कोळशावर आधारित भट्टचा उभारल्यामुळे दरवर्षी तीस लाख रुपयाची बचत होईल असं साग-ण्यात आलं मग यापूर्वीच हा बदल का केला नाही ? शिवाय कोळशावर आधारित भट्टी उभारायचं अहवालात स्पष्टपणे म्हटलेलं असूनही तेलभट्टी उभारण्यात का आली ? याला जबाबदार कोण तेही पाहिलं पाहिजे.

यंत्रमाग आणि शेडस यावर सुरुवातीच्या काही वर्षात Depriciation (घसारा) धरण्यात येणार नाही असही अहवालात म्हटलं आहे पण प्रत्यक्षात मात्र हिशेबात तसा तो धरण्यात आला आहे. अर्थात जिथं कोळसाभट्टीऐवजी तेलभट्टी उभारली जाते तिथं हा मुद्दा फारच किरकोळ झाला. आता या अहवाल तलाच एक विरोधाभास सागतो सूत-प्रक्रियेची क्रिया ही केन्द्रित असावी असं या अहवालात म्हटल आहे आणि ती विकेन्द्रित हवी असंही त्याच अहवालात पुढं म्हटलं आहे ! श्री कॅस्टेलिनो याच्या मते ही क्रिया केन्द्रित असण जास्त सोयीचं आहे.

शेवटी हृया प्रकल्पाचं काय होणार हा प्रश्न उरतोच. तो एक स्वयंपूर्ण, आर्थिकदृष्टचा स्वावलबी उद्योग होणार की सामाजिक न्यायाखाली एक पाढरा हत्ती आपण पोसणार आहोत ? श्री. कॅस्टेलिनो म्हणाले की मराठवाडा वस्त्रमहामडळाला पुरेशी सधीच देण्यात आलेली नाही. कोणतीही कापडगिरणी पहिल्या वर्षापासून फायद्यात जाऊ शकत नाही. अगदी खाजगी गिरण्याही पहिली काही वर्षं तोटचातच चालतात, पण त्याच्याकडे तो तोटा सहन करायची ताकद असते. या प्रकल्पासाठी तशी तरतूद करण्यात आली नाही. किंबहुना हा तोटा गृहीत धरण्यात आलाच नाही. त्याशिवाय या प्रकल्पाला मध्यतरी, विशेषत गेल्या वर्षी, तीव्र वीज-टचाईला तोड द्याव लागलं या प्रकल्पाच्या म्हणून काही खास अडचणीही त्यानी सागितल्या. मराठवाडचासारख्या मागास भागात हा प्रकल्प उभारण्यात आला आहे त्यामुळे प्रशिक्षित कामगाराचा अभाव, वाहतुकीचा जादा खर्च, प्रशिक्षित तंत्रज्ञाचा अभाव वगैरे वगैरे या अडचणी लक्षात न घेताच विणकरापुढे एक गुलाबी चित्र रगवण्यात आलं आणि त्याच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळ त्याच्यात असतोष निर्माण झाला.

आजची सर्वांत महत्त्वाची अडचण ही खेळत्या भाडवलाची आहे. कमीत कमी दोन कोटी रुपयाच खेळतं भाडवल मिळायला हवं. सरकारकडे याबाबत विनती करण्यात आली आहे आणि येत्या एक–दोन महिन्यात त्याबाबत काय ते कळेल, पुरेस खेळत भाडवल मिळाल तर हा प्रकल्प स्वत च्या पायावर उभा राहू शकेल अस श्री. कॅस्टेलिनो यानी सागितल

एकदरीतच या प्रकल्पाचा मुळापासून नव्यान अभ्यास होण्याची गरज आहे आज तिथं फक्त एका ठराविक प्रकारचच कापड तयार होतं, त्यात विविधता आणायच्या दिशेन विचार होण अगत्याच आहे.

महामडळाचा बराच पैसा हा सूत–खरेदी वर खर्च होतो यासाठी महामडळ स्वत च सूतनिर्मिती करू शकेल काय याचाही विचार व्हावा.

मुख्य म्हणजे विणकराच्या पुनर्वसनासाठी हा प्रकल्प सुरू करण्यात आला याचा विसर पडू नये; परतु त्याबरोबरच हा सगळा खटाटोप आर्थिकदृष्टचा स्वावलबी कसा होईल याचीही काळजी घ्यायला हवी आज अवस्था अशी आहे की वस्त्रनिर्मितीच्या या उद्योगाच्या नाकापुढे सूत धरायची पाळी आली आहे (वास्तविक ही कोटी टाळायचा आटोकाट प्रयत्न केला; पण मोह आवरला नाही !) □


मोठमोठचाना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —ग. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकाची, सर्वसामान्य वाचकाची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.

तिसरी आवृत्ती । किमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# सामुराईची तलवारबाजी

रमेश जोशी

ॲमस्टरडॅमच्या शिफोल विमानतळावर विमानात बसता बसता स्वागतिकेने उपग्रहाच्या मदतीने छापला जाणारा इंटरनॅशनल हेराल्ड ट्रिब्यूनचा अंक हातात ठेवला. विमानाने उड्डाण केले आणि खाडी पार करून ब्रिटनच्या भूभागावरून ६५००० फूट उंचीवरून ॲटलांटिकवर झेपावले. आठ तासाच्या उड्डाणात मी ट्रिब्यूनचा सारा अंक वाचून काढला. सर्वशक्तिमान अशा अमेरिकन राष्ट्रावर परकीय आक्रमणाचे सावट पसरल्याची आणि आक्रमणाने चांगलाच पायरोवा केल्याची पहिली चाहूल मला तेथे लागली. नंतरच्या दहा दिवसाच्या वास्तव्यात मी त्याचा मागोवा घेत राहिलो. सामान्य अमेरिकन नागरिकाला हे आक्रमण जाणवत होते; पण त्याला त्याची टोचणी मात्र भासत नव्हती. मी मात्र मागोवा घेत राहिलो बातम्या वाचत राहिलो. गोळा करत राहिलो आणि मराठी वाचकांसाठी त्याचे संकलनही करत राहिलो.

'जपानी निर्यात सप्टेंबर १९८० मध्ये १३.५ टक्क्यांनी वाढली. ऑगस्टमध्ये ती १० ८५ कोटी डॉलर्स होती ती सप्टेंबरअखेरपर्यंत १२.२९ कोटी डॉलर्स झाली. १९७९ च्या सप्टेंबरअखेरीला तीच निर्यात ९·१६ कोटी डॉलर्स होती. ग्राहक निर्देशांक ८ टक्क्याने वाढूनदेखील जपानी मालाच्या किंमती ०.३ टक्क्यांनी खाली आल्या वाढत्या निर्यातीने येनला बळ प्राप्त झाले आणि डॉलर घसरला. घाऊक उठावामुळे किंमती खाली आल्या. दोनही कारणांनी अमेरिकन ग्राहकाचा फायदा झाला

टोयोटो कंपनीचा अध्यक्ष ऐजी टोयोडा म्हणतो, ' डिसेंबरअखेरपर्यंत टोयोटो मोटारगाड्या विकण्याचे अमेरिकेतील लक्ष्य आम्ही सप्टेंबरमध्येच ओलांडले. आता आणखी मोटारी आम्ही अमेरिकेला निर्यात करणार नाही. म्हणजे त्या विकल्या जाणार नाहीत असा मात्र अर्थ नाही; पण जपानी गाड्यांची तडाखेबंद विक्री कोणाच्या डोळ्यावर येऊ नये म्हणून माझे असे मत आहे '

हा प्रकार म्हणजे एखाद्या आक्रमक राष्ट्राने शेजारी राष्ट्राचा बराच मोठा भूभाग बळकवावा आणि मग एकतर्फी युद्धबंदी जाहीर करावी असाच नाही का ?

टोयोटोखालोखाल होन्डा मोटार्सनेही विक्रमी विक्री केली. ३१ ऑगस्टला संपणाऱ्या दुसऱ्या तिमाहीत त्यांनी जवळजवळ १४५ दशलक्ष डॉलर्स किंमतीच्या गाड्या विकल्या. याच तारखेची मागील वर्षीची त्यांची विक्री फक्त ४८ दशलक्ष डॉलर्सची होती. या तडाखेबंद विक्रीमुळे पहिल्या सहामाहीतच होन्डाचा नफा २७९ दशलक्ष डॉलर्सवर गेला. त्याआधीच्या सहामाहीपेक्षा हा नफा फक्त ३५० टक्क्यांनी जास्त आहे.

होन्डाचे वर्ष २८ फेब्रुवारीला संपते करभरणा केल्यानंतर नफ्याचे आकडे त्यांनी आता पुन्हा सुधारून घेतले आहेत नवीन अंदाजाप्रमाणे ३२ २० बिलियन येन नफा हा १ ३५ ट्रिलियन येन या एकूण विक्रीवर धरला आहे त्याआधीचा १ २८ ट्रिलियन येन एकूण विक्रीवर २९.०० बिलियन येन नफा धरला होता गेल्या वर्षी १.०७ ट्रीलीयन येन विक्रीवर २३ बिलीयन येन नफा झाला होता.

पहिल्या सहामाहीतील एकूण उत्पादनापैकी ६६२ ८५ बिलीयन येन हे फक्त निर्यातीतून जपानकडे खेचले गेले गेल्या वर्षीपेक्षा ४४ टक्क्यांनी होन्डाची निर्यात वाढली.

होन्डाने एकूण ४६७,००० मोटारी पहिल्या सहामाहीत विकल्या. त्यातील ३३२,००० एवढ्या मोटारी निर्यात केल्या. १ ५९ दशलक्ष मोटारमायकली तयार केल्या त्यातल्या १.०६ दशलक्ष मोटारमायकली निर्यात केल्या.

होन्डा, टोयोटो, निसान यांसारख्या जपानी मोटारकंपन्या अमेरिकन बाजारात वर्चस्व प्रस्थापित करत असताना फोर्डसारखी प्रचंड आणि आद्य कंपनी काय करत असेल ?

जपानी धूमधडाक्याने कासावीस होऊन मोटारउद्योग आणि कामगारसंघटनांनी फार आरडाओरड केली मग अमेरिकेने या आयातीच्या प्रश्नाची चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमले 'पाच वेगवेगळ्या थरातील प्रतिष्ठित नागरिकांची नेमणूक केली आणि त्यांच्यापुढे चौकशी चालू झाली. माझ्या वाचनात फोर्ड कंपनीच्या अध्यक्षाची आणि कामगार संघटनेच्या प्रवक्त्याची साक्ष आली.

जपानी गाड्यांच्या आयातीवर निर्बंध घालावेत की काय असा चर्चेचा विषय होता. आयातीवर निर्बंध घातले तर बेरोजगारी कमी होऊ शकेल; पण इतक्या कमी किंमतीत अमेरिकन गाड्या मिळणार नाहीत यावर साऱ्यांचे एकमत होते.

फोर्डसारख्या बड्या कंपन्यांनी छोटी मोटारगाडी का उत्पादित करू नये ? अमेरिकन मोटारकंपन्यांचा तोटा या वर्षी ४ बिलीयन डॉलरपर्यंत जाणार याला कोण जबाबदार ?

फोर्ड आणि कामगारांचे मत पडले की प्रचंड प्रमाणावर आयात हेच याचे कारण आहे. पण जपानी प्रवक्ते आणि डीलर्स असोसिएशन म्हणते की हे काही कारण नव्हे, तो परिणाम आहे.

या कमिशनचे काम अजून चालू आहे आता यथावकाश हे चर्चासत्र पूर्ण होणार, मग अहवाल बनणार आणि मग तो निर्णयासाठी अध्यक्षापुढे ठेवणार

या कमिशनच्या कार्याविषयी जपानी प्रतिक्रिया फारच सावध आहे. ' अमेरिकेतील मोटारउद्योगातील बेकारीची समस्या फार प्रचंड

आहे. ते जसा निर्णय देतील तसा तो आम्ही मान्य करू.'

१९८० साली जपानची परदेशी गुतवणूक फार मोठ्या प्रमाणावर झाली. तुलनाच करायची तर दुसऱ्या महायुद्धानतर झालेल्या अमेरिकन बहुराष्ट्रीय कपन्यानी केलेल्या गुतवणुकीशीच करावी लागेल.

खुद्द जपानमध्ये मात्र सध्या अतिअद्ययावत्, इंधनाची बचत साधणारे, मनुष्यबळ कमीत कमी वापरणारे कारखाने उभारले जात आहेत. नुसते उल्लेख वाचनात आले, पण तपशील मात्र आढळला नाही. अमेरिकन आणि युरोपियन बाजारपेठेवर सतत वरचष्मा ठेवण्याच्या दृष्टीनेच ते प्रयत्न चालू असावेत.

मला वाटतं या दोन्ही गोष्टी एकमेकाना पूरक आहेत आणि त्याची एक साखळी आहे. जपानी निर्यातीबद्दलची वाढती असूया भाडवलगुतवणुकीनेच कमी करता येईल त्या त्या देशातील बेकारी कमी होईल, पक्का मालही तेथेच बनेल आणि मग नफ्याचे लोणी निर्धोक जपानला नेता येईल. खुद्द जपानच कच्च्या मालावरील परावलबन सपूर्ण आहे. नुसत्या तेलाचच वार्षिक बिल ६० बिलियन डॉलरच्या घरात जात.

पण जपानमधील कारखानदारी मात्र त्यावरही वर्चस्व गाजवेल. जपानमध्ये आता यात्रिक मानव वाढत्या प्रमाणावर तयार व्हायला लागले आहेत. कॉम्प्युटर्स तयार करण्यात त्याने आता खूपच आघाडी मारली आहे. व्हीडीयो रेकॉर्डर्समध्ये तर जपानला स्पर्धाच नाही !

एखाद्या अमेरिकन अथवा युरोपिअन पुढाऱ्याने निर्यात कमी करण्याबद्दल जपानला धमकावले नाही असा दिवस जात नाही. कोठलेही वृत्तपत्र उघडा ही बातमी असतेच विशेषतः मोटारगाड्या, जहाजे, पोलाद, टी. व्ही. सेट्स् आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादने इतक्या प्रचड वेगाने जपानमधून निर्यात होत आहेत की ही राष्ट्रे या आयातीवर कडक निर्बन्ध घालण्याची केव्हाही शक्यता आहे. हा सारा ओरडा या दोनच वर्षातला आहे. म्हणूनच मला वाटतं की जपानी भाडवलदारानी गुतवणुकीची योजना पूर्णपणे तयार केली होती, पण निर्यातीने टोक गाठल्याशिवाय त्याना ती करावयाची नव्हती.

दहा वर्षांपूर्वीपर्यंत जपानी गुतवणूक ३ ५ बिलियन डॉलर्स एवढीच होती. १९८० साली ती ३५ बिलियन डॉलर्सवर जाईल. १९९० साली ती १५० बिलियन डॉलर्स एवढी होईल व २००० साली अमेरिकन परदेशी गुतवणुकीला ती माग टाकू शकेल.

जपानी गुतवणूक ही साऱ्या जगभर तर आहेच; पण ती वेगवेगळ्या उत्पादनावरही लागलेली आहे.

इडोनेशियात नैसर्गिक वायूचे द्रवरूपात रूपातर करण्यासाठी हा पैसा लागला आहे. मध्यपूर्वेत ही गुतवणूक पोलादाचे आणि पेट्रोकेमिकल्सचे अवाढव्य प्रकल्प-उभारणीत लागली आहे. या गुतवणुकीतून ब्रिटनमध्ये अद्ययावत् जेट इजिने तयार होतात. ऑस्ट्रेलियात हाच येन कोळशापासून तेल बनवतो. यातील प्रत्येक प्रकल्प शेकडो कोटी डॉलरचा आहे.

अमेरिकेतील जपानी गुतवणुकीने मात्र वरील सर्व आकडेवारीवर ताण केली आहे. काही अमेरिकन अर्थतज्ज्ञाच्या अदाजाप्रमाणे १९८० सालीच अमेरिकेतील जपानी गुंतवणूक ४० बिलियन डॉलरवर जाईल !

योशोतोमो तनाका हा जपानी अर्थमंत्रालयात ओव्हरसीज प्रायव्हेट इन्व्हेस्टमेंट डिव्हिजनचा डायरेक्टर आहे. तो म्हणतो "अमेरिकन बाजारपेठ म्हणजे आमचा प्राण आहे. त्याशिवाय आम्ही जगूच शकणार नाही, पण आता आम्हीही हात आखडता घ्यायला हवा. नुसती निर्यात करण्यापेक्षा त्या त्या देशात गुतवणूक करायला हवी. विशेषतः अमेरिकेत तशी ती होणे हे फारच जरुरीचे आहे!"

तनाका रगीत टी. व्ही. सेटस्च्या उत्पादनाचे उदाहरण देतो. १९७६ साली जपान्यानी ३० लाख रंगीत टी. व्ही. सेट्स् अमेरिकेत विकले. परिणामी या व्यवसायातील उद्योग तोटयात आले आणि मग बद पडले नतर कामगारसघटना जाग्या झाल्या आणि त्यानी एकच गदारोळ उठवला. मग बेरोजगारी कमी करण्यासाठी अमेरिकन सरकारने कोटापद्धती चालू केली. ती पद्धत लागू झाल्याबरोबर मात्सूशिता आणि सोनी या दोन जपानी कपन्यानी अमेरिकेत शेकडो कोटी डॉलरस्ची गुतवणूक केली. टी. व्ही. सेटस् अमेरिकेतच बनवून त्याची धूमधडाक्याने विक्री केली.

या वर्षी जपान ३५ लाख टी. व्ही सेटस् अमेरिकेला निर्यात करेल. पण जवळजवळ ३० लाख टी व्ही. सेटस् जपानी भाडवलावर अमेरिकन कामगार तयार करून विकतील ते वेगळेच.

मोटारगाड्याच्या कारखानदारीतही आज जवळपास हीच परिस्थिती येणार आहे अमेरिकन रस्त्यावर धावणाऱ्या एकूण गाड्यापैकी २५ टक्के गाड्या जपानी आहेत. जर्मन वोक्सवॅगनचा एके काळी अमेरिकेत फार बोलबोला होता. आज ही गाडी रस्त्यावर दिसत नाही क्रायस्लॅर कॉर्पोरेशन आज दिवाळखोरीच्या उबंठ्यावर उभी आहे फोर्डने तोटयाचा नवा उच्चाक गाठला आहे आणि जनरल मोटार्सचीही परिस्थिती फारशी वेगळी नाही. मोटारगाड्याच्या बाबतीही कोटापद्धत केव्हाही सुरू होऊ शकेल.

यावर मात करण्यासाठी होन्डाने कॅलिफोर्नियात एक प्रचड कारखाना उभारला आहे निसानची ३०० दशलक्ष डॉलरची गुतवणूक अमेरिकेत होत आहे १९८३ साली त्या कारखान्यातून छोट्या पिक् अप् व्हॅन्स् बाहेर पडू लागतील. फोर्ड कॉर्पोरेशनने सध्या टोयोटोबरोबर छोट्या गाड्यांच्या तंत्रज्ञानासाठी व भाडवलासाठी बोलणी लावली आहेत.

मोटारगाड्या तयार करण्यासाठी जपानी भाडवल येऊ देण्यास पश्चिम युरोपचा मात्र कडवा विरोध आहे. निसानने इटलीमध्ये अल्फा रोमिओशी सगनमत केले होते पण फियाटने विरोध केला; म्हणून सारी योजना बासनात गुडाळून ठेवावी लागली. फ्रान्सने फ्रान्समधील एकूण खपाच्या फक्त ३% गाड्या आयात करायला परवानगी दिली आहे

इलेक्ट्रॉनिक उत्पादने आणि कापडव्यवसाय यात मनुष्यबळ जरा जास्तच लागते, जपानमधली मजुरीही वाढती आहे म्हणून मग या दोन धद्यातले जपानी भाडवल दक्षिण कोरिया आणि तैवानमध्ये मोठ्या प्रमाणावर गुतले आणि तेथून प्रचड निर्यात केला. गेली. फायद्याचे लोणी जपानमध्ये गेले.

जपानी पोलादनिर्मिती यदा अमेरिकन पोलादनिर्मितीला नक्कीच

मागे टाकणार! जपान्यांनी या कारखानदारीसाठी स्वतचे सुधारित तंत्र वापरले गणकयंत्राचा उपयोग मोठया प्रमाणावर केला. वाया जाणारी धग आणि गॅस पुन्हापुन्हा उपयोगात आणला Continuous casting ची पद्धत बसवून दिली. यामुळे निर्मितिक्षमता तर वाढलीच शिवाय १९७४ सालाच्या तुलनेत इंधनाची व विद्युतशक्तीची १०% बचत झाली.

उत्पादनाच्या तंत्र आणि यंत्र या दोन्हीसाठी पश्चिमेकडे अथवा कोणाकडे तरी पहाण्याच्या प्रवृत्तीला हे चांगले उत्तर नाही का ?

विडीओ टेपरेकॉर्डर्सना जपानला अजिबात स्पर्धाच नाही. सोनी मात्सूशिता आणि व्हिक्टर या तिघांचे एकत्रित लक्ष्य आहे ३० लाख सेटसच्या निर्यातीचे. जवळजवळ ३ बिलीयन डॉलर्सचं चलन जपान या निर्यातीतून खेचू शकेल

सोनीचा अध्यक्ष म्हणतो 'व्हिडीओ उपकरणाच्या निर्यातीची आम्हाला काळजीच नाही. अमेरिकन किंवा युरोपिअन मजुरी बुडत आहे म्हणून कोणी ओरडत नाही. निर्यात अशी Perfect असायला हवी.'

अमेरिका आणि युरोपमध्ये फारसे दिसत नसलेले आणखी एक आश्चर्य निर्माण करण्यात जपानने फार मोठी आघाडी मारली आहे. रोबोट–यांत्रिक मानवाचे उत्पादन आणि विक्री जपानमध्ये जोरात चालू आहे, या वर्षअखेरपर्यंत यांत्रिक मानवाची विक्री २५० दशलक्ष डॉलर्सची झाली असेल. जगात वापरात असणाऱ्या एकूण यंत्रमानवांपैकी निम्मे फक्त जपानमध्ये एकवटले आहेत. जपानी यंत्र–मानव अवजड उद्योगात अथवा तेच तेच काम असणाऱ्या जागी कार्यान्वित झालेले आहेत. थकवा आल्याने वेळ वाया जात नाही अथवा तेचतेच काम करून कटाळल्याने होणाऱ्या चुकाही होत नाहीत. १९८५ सालचे यंत्रमानवविक्रीचे लक्ष्य आहे १.२५ बिलीयन डॉलर्स.

गम्मत म्हणजे १९६७ साली जपानने एक यंत्रमानव अमेरिकेतून आयात केला. त्याची नक्कल तर केलीच पण त्यावर अधिक संशोधन करून सुधारणा करण्यासाठी एक संस्था स्थापन केली. पुरेसे संशोधन झाल्यावर ते सारे खाजगी उद्योगाकडे सोपवून दिले पुढील संशोधन, त्याची निर्मिती आणि विक्री या साऱ्या गोष्टी त्यानीच सभाळल्या. हे सारे यंत्रमानव आज जपानी कारखान्यात कामे करत आहेत. कोणतीही मजुरी न घेता, मालाचा दर्जा कायम ठेवून किमती खाली आणत आहेत. अमेरिकन आणि युरोपिअन बाजारपेठेवर सतत वरचष्मा राखून आहेत आणि लक्षावधी डॉलरचे चलन जपानी तिजोरीत ओतत आहेत.

१९७३ साला तेलदरवाढीचा दणका बसला आणि मग या यंत्रमानवाची निकड जाणवू लागली. या दशकाअखेरपर्यंत जवळजवळ २००० कारखान्यात त्याचा उपयोग करून घेतला जातो. इतके होऊनही कामगारकपात कोठेही नाही. उत्पादन सतत वाढते आहे. आणखी एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे इतके यंत्रमानव बसूनही अद्यापही कामगाराला त्याच्या आयुष्यभराच्या नोकरीची हमी दिली जाते.

पोलाद करणाऱ्या एका कारखान्याने यंत्रमानव मोठ्या प्रमाणात आपल्या कारखान्यात बसवून घेतले. त्यामुळे त्याचे ५०० अधिक कामगार मोकळे झाले. या साऱ्या कामगारांना त्याच व्यवस्थापनाने चालू केलेल्या खारावलेले मासे हवाबद डब्यात भरणाऱ्या कारखान्यात ठेवून घेतले. कामातला आणि जागेतला हा बदल कामगारानी विनातक्रार स्वीकारला. व्यवस्थापनानेही पहिल्या वर्षाचा पोलादकारखान्याचा नफा तिकडे वळवून कामगाराना भक्कम बोनस दिला आणि त्यानी दाखवलेल्या सामजस्याची भरपाई केली

तोयोटो आणि निसान याच्या तुलनेत तोयो–कोग्यो ही कंपनी म्हणजे अगदीच नगण्य, त्याची मॉडेल्स जास्त होती आणि असेम्ब्लीलाइन एकच, त्यामुळे जुळणीचा खर्च जास्त यायचा. मग त्यानी सापासारख्या दिसणाऱ्या लाइनवर यंत्रमानव बसवले आणि या एकुलत्या एक लाइनवर वेगवेगळी मॉडेलस दिली सरकवून. आता हे यंत्रमानव त्यांच्या इलेक्ट्रॉनिक डोळयानी वेगवेगळी मॉडेल पटकन ओळखतात आणि त्याप्रमाणे जुळणी करतात. तोयो–कोग्यो त्यामुळे आज तोयोटो आणि निस्सानच्या तुलनेत गाडी देऊ शकते

मात्सूशिताच्या कारखान्यात रेकॉर्डर्स, टीव्ही याच्या इलेक्ट्रॉनिक कार्डाची जुळणी तर हे यंत्रमानव करतातच पण तयार झालेला माल प्रमाणाबरहुकूम आहे किंवा नाही हेही पण यंत्रमानवच तपासतात.

रोबोट असोसिएशनचा डायरेक्टर योनेमोटो म्हणतो- 'आमच्याकडे यंत्रमानव बसवायला कामगाराचा विरोध तर नसतोच, पण त्याचा तसा आग्रह असतो. यंत्रमानवामुळे उत्पादन वाढते, दर्जा राखला जाऊन किम्मतही कमी होते, कारखानदारी वाढते व वेतन सुधारते.'

गणकयंत्र बसवायला विरोध करणाऱ्या आमच्या कामगारसंघटना व कामगारकपात करणारे आमचे मालक या दोघानाही यापासून धडा घेता येईल.

आणि म्हणूनच योनेमोटो पुढे म्हणून जातो– 'जोपर्यंत इतर देश आपल्या कामगाराशी वागण्यात अथवा त्याना वागवून घेण्याच्या पद्धतीत सुधारणा करीत नाही तोपर्यंत त्याना यंत्रमानव बसवता येणार नाहीत!'

कावेबाज जपानने हे एव्हढेच क्षेत्र आज असे ठेवले आहे की यंत्रमानव निर्यातीचे अजिबात प्रयत्न इथे चालू नाहीत. यदाची निर्यात २५० दशलक्ष डॉलर्सपैकी फक्त ५ टक्क्याची आहे. १९८५ साली १.२५ बिलियन डॉलर्समध्ये ती फक्त १५ टक्के असेल.

अत्सूशी कावाशिमा, या खात्याचा डेप्युटी डायरेक्टर म्हणतो, 'म्हणजे याचा अर्थ हे तंत्रज्ञान आम्ही आमच्यापुरते मर्यादित ठेवणार आहोत असा मात्र कोणी घेऊ नये. पण देशातर्गतच खप इतका प्रचड आहे की, निर्यातीसाठी काही शिल्लकच रहात नाही!' यावर कोणाचा तरी विश्वास बसेल काय ?

सारा तपशील थोडा अधिक लाबला, पण जवळ कोणताही कच्चा माल नसताना अतिसुधारलेल्या अमेरिकन आणि युरोपच्या उरी धडकी भरवणारा जपान आज कुठे आहे त्याची चुणुक मला वर्तमानपत्रातील बातम्यावरून जाणवली. आज जपानची खरी निर्यात त्याच्या कार्यक्षमतेची आणि तडफेची आहे. सरकार, मालक व कामगार या साऱ्याना ती समजावी म्हणून हा उपद्व्याप केला. खरी भीती वाटावी ती लष्करी आक्रमणापेक्षा अधिक भयकर अशा आर्थिक आक्रमणाची. जपानचा सामुराई आजही पश्चिमेत तलवार गाजवतो आहे. त्या तुलनेत आपण कोठे आहोत ? काय करता आहोत ? □

# साखर धोरणाबाबत शास्त्रीय फेरविचार हवा !

पंत मोडक, नासिक

साखर ही वस्तू तशी आपणास नवी नाही. भारतीयाचा व साखरेचा सबध हजारो वर्षांपासूनचा आहे. गेल्या दहा–बारा महिन्यात साखरेच्या भावात जी प्रचड वाढ झाली त्यामुळे उच्च वर्ग वगळता सर्वचजण चागलेच होरपळून निघाले आहेत; पण कृषिउत्पन्नाच्या भावातील वाढीची मागणी केव्हा तरी होणारच होती गेल्या वर्षीचे कादा व सध्याच्या ऊसआदोलनामुळे या महत्त्वाच्या प्रश्नाला आता तोड फुटले आहे. अन्य कोणत्याही लोकशाही देशात, तेथील शेतकरी-वर्गाने अशा तऱ्हेचा अन्याय इतकी वर्षे सहन केला नसता. तेथे असल्या अन्यायामुळे सरकारला वारवार राजीनामा देण्याची पाळी आली असती व असल्या ढळढळत्या अन्यायाचे कायमचे निराकरण होईपर्यंत त्या देशाला कायमचे स्थिर सरकार मिळाले नसते. आता तरी आपल्याकडील लोकशाही राज्यव्यवस्था म्हणजे मुखवटा पाघर-लेली हुकूमशाही आहे, हे आम जनतेच्या व जगाच्या समोर आले, हेही नसे थोडके !

निवडणूक–जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने पुरी करण्याचा विचारही मनात न आणता जनतेच्या तोडाला पाने पुसून आश्वासनाची खैरात करण्याचा व सतत डोळ्यात धूळ टाकण्याचा प्रयत्न करणारे सरकार येथे शातपणे राज्य करू शकते, हे पाहून परदेशातला सुजाण नागरिक मनात म्हणत असेल की भारतातली बहुसंख्य जनता बावळट, नालायक वा कोडगी बनलेली आहे !

अलीकडच्या काळात महाराष्ट्रात साखरेचा पहिला कारखाना चालू शतकाच्या दुसऱ्या दशकात निघाला. नंतरही प्रयत्न झाले. परंतु या शतकाच्या तिसऱ्या व चौथ्या दशकात व नंतर साखर-धंद्याने इथे खरे मूळ धरले.

सुरुवातीला साखरकारखाना व उसाचा महामळा हे एकाच नियत्रणाखाली असत व त्या वेळी बेलापूर कंपनीच्या ऊसमहामळ्याचे व्यवस्थापक श्री. महाजन यानी उसाच्या लागवडीत फार महत्त्वाची कामगिरी केली. त्याच्या प्रोत्साहनाने उसाच्या एकरी उत्पादनात अनेक उच्चाक गाठले. जास्तीत जास्त उत्पन्नाचे एकरी १३२ टन व सरासरी ५० ते ६० टन हे त्या वेळचे आकडे आजही नेत्रदीपक वाटतात

विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात लागोपाठ दहा–बारा कारखाने निघाले. साधारणतः १९६० पासून डॉ. धनंजयराव गाडगीळ याच्या प्रेरणेने सहकारी साखरकारखान्याना सुरुवात झाली व आज त्याची संख्या ६५ ते ७० च्या आसपास आहे.

कोइमतूर येथील उसबीजजनन सस्था व कानपूर येथील साखरसंस्था यानीही साखरधंदा ऊर्जितावस्थेस आणण्यास फार मोठी मदत केलेली आहे. १९३० साली ब्रिटिश सरकारनेही परदेशी साखरेवर आयातकर लादून या धद्याला चागलेच सरक्षण दिले.

आजमितीला साखरकारखान्याच्या तंत्रात खूपच सुधारणा झाली आहे, पण प्रत्यक्ष उसाच्या लागवडीच्या तंत्रात मात्र म्हणावी तशी सुधारणा झालेली नाही, किंबहुना पीछेहाटच झालेली आहे. साखर–कारखान्याच्या उत्पादनतंत्रात झालेल्या सुधारणाचे पुष्कळसे श्रेय परदेशी तंत्रज्ञानाच आहे.

हल्लीचे सहकारी साखरकारखाने हे एक प्रकारे पूर्वीची सस्थानेच बनली आहेत. पूर्वी औंध, बडोदा, म्हैसूर ही जशी सुधारलेली संस्थाने होती, तसेच हल्ली वारणा, प्रवरा व आणखी काही कारखाने झाले आहेत राहिलेल्या कारखान्यांपैकी अनेक "आजारी" आहेत. आज-मितीला राहुरीचा एकमेव कारखाना बँकेच्या–सावकाराच्या कचाटयातून मुक्त झालेला आहे.

गेल्या वर्षीचे कादाआदोलन व सध्याचे ऊसआदोलन ही शेतकऱ्याच्या दु खाला तोड फोडणारी नादी आहे ह्या दोन आदोलना-मुळे शेतकरीवर्ग जागा होऊ लागला आहे ही आदोलने म्हणजे महासागरातील हिमनगाच्या पाण्याच्या पृष्ठभागावरील अंशासारखी आहेत. जागा झालेला किसान आता यापुढे न परवडणाऱ्या भावाचा अन्याय सहन करणे अशक्य आहे मध्यमवर्गाने या आदोलनामुळे होणाऱ्या तात्पुरत्या त्रासाला न कटाळता, न चिडता त्याला पाठिंबाच दिला पाहिजे !

आज श्री. शरद जोशी व श्री. माधवराव बोरसे हे फक्त ऊस व कादा याकरिताच आधारभूत भाव मागत आहेत; पण त्यानाही यापुढे या दोन पिकाचेच भाव वाढवून द्या असे म्हणून भागणार कारण नाही. त्यानी आता शेतकऱ्याला त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाण करून दिली आहे. कादा–ऊस शेतकरी एकदर शेतकऱ्याच्या फार तर एक टक्का असेल तेव्हा श्री जोश्याना व त्याच्या सहकाऱ्याना आज–उद्या इतर सर्व शेतकऱ्याच्या आदोलनाची धुरा खाद्यावर घ्यावीच लागेल. ज्याना परकीयाची फूस व मदत आहे व जे रक्तरंजित क्रान्तीलाही तयार आहेत असे पक्ष हे शेतकरी आदोलन स्वत च्या पखाखाली घेण्यास टपून बसले आहेत. तेव्हा ते होऊ न देण्याकरिता तरी शरद रावांना आता कदाचित नाइलाजाने का होईना, देशातील ७० टक्के शेतकऱ्याचे पुढारीपण स्वीकारावेच लागेल !

भारतातील साखरेच्या वार्षिक उत्पादनाने ६२ ते ६५ लाख टनाची मर्यादा गाठलेली होती हे उत्पादन कायम कसे राहील हे पाहण्याची जबाबदारी सरकारची होती; पण गेल्या दहा वर्षांत या दृष्टीने पद्धतशीर पाउले टाकण्यास कोणतेही केंद्र सरकार पूर्णपणे अपयशी

ठरले आहे. याचे कारण म्हणजे आमच्या केंद्र व प्रांतिक कृषिमंत्र्याना शेतकऱ्याच्या खऱ्या दुःखाची जाणीवच नाही. सनदी कर्मचाऱ्याच्या चौकटीतल्या काही अधिकाऱ्याना कदाचित शेतकऱ्याच्या खऱ्या अडचणीची व दुःखाची माहिती असेलही; पण इतर वर्ग स्वतःची चैन, सुख–सोयीची जपणूक यातच गुरफटलेला व मंत्र्याच्या दडपणाखाली दबलेला व लाचार बनलेला असतो. एखाद्या सनदी नोकराने धीटपणाने तोंड उघडलेच तर त्याला खड्यासारखे उचलून एखाद्या शोभिवंत जागेवर किंवा रजेवर पाठविले जाते.

श्री. शरद जोशी याच्या म्हणण्याप्रमाणे, पूर्ण बागाइत, खात्रीचे उत्पन्न देणाऱ्या शेतकऱ्याला जर कादा व ऊस चालू भावात परवडत नाहीत, तर बेभरवशाच्या, निव्वळ पावसावर अवलंबून असणाऱ्या कोरडवाहू शेतकऱ्याची काय स्थिती असेल ? त्याला तर मनात असतानाही, कष्ट करून पावसाअभावी पीक हातचे गेले म्हणजे टाचा घासत नेहमीच अर्धपोटी व अर्धवस्त्र राहण्याची पाळी येते तो विचारा शहरी वा अर्धशहरी वस्तीपासून दूर व सतत अर्धपोटी असल्यामुळे संघटितही होऊ शकत नाही. त्याला खरे म्हणजे कर्जमाफीच्या भाकरीचा फेकलेला शिळापाका तुकडा नको असून मालाला योग्य भावाची हमी व निसर्गाने दगा दिल्यास विम्याचे संरक्षण हवे आहे. त्याला कर्ज–माफी पदरात पाडून घेऊन, लाचारीने सरकारला मिंधे व्हावयाचे नाही, तर व्याजाचे माफक दराने स्वतःच्या हिंमतीवर कर्ज फेडून, ताठ मानेने जगावयाचे आहे.

आता आपण आजच्या साखरेच्या ज्वलंत प्रश्नाकडे वळू. उसाचे चागले पीक खरे म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू व त्याखालोखाल गुजराथ व मध्यप्रदेशात होते. उत्तरप्रदेश व बिहारमध्येही ऊस होतो; पण तेथील एकरी उत्पन्न अति निकृष्ट प्रतीचे असते. (महाराष्ट्र, आंध्रप्रदेश,कर्नाटक, तामिळनाडूत सरासरी एकरी ऊसउत्पन्न ३५ ते ४० टन तर उ. प्रदेश व बिहारात ते एकेरी १५ ते २० टन ) दक्षिण–मध्यभारतात उसाचे उत्पन्न काही वेळा ८० टनापर्यन्तही गेलेले आहे तर उत्तर भारतात ते एकरी २५ टनांच्यावर कधीही गेलेले नाही.

श्री. शरद जोशी याच्यासारख्या संख्याशास्त्रज्ञ व प्रत्यक्ष शेती करून अनुभव घेतलेल्याने उसाला व कांद्याला नुसता आधारभूत (Floor price) भाव न मागता, ग्राहकांचे क्रयशक्तीचा विचार करून, त्यांच्याच जोडीला साखरेच्या धंद्याची अयपासून इतिपर्यंत पुनर्रचना करण्याची मागणी केली पाहिजे.

गेल्या तीस वर्षांत कामगार, कचेऱ्यांमधील कर्मचारी व सरकारी नोकर यांनी संघटित होऊन पदरात पुष्कळ पाडून घेतले. विविध उद्योगातील व सरकारी अधिकाऱ्यावद्दल तर बोलावयासच नको. शिवाय हातातील अधिकारांमुळे त्याना त्याच्या अधिकृत उत्पन्नावरच जगावे लागते असेही नाही.

तेव्हा आता कादा व ऊस याच्याकरिताच योग्य आधारभूत भाव न ठरविता, भात, ज्वारी, बाजरी, गहू, तेलबिया, कडधान्ये, बटाटे, गूळ याचे आधारभूत भाव ठरवून त्याची सागड, मजुरी, पगार स्वतःचा फायदा, कारखाने व सरकारी उद्योगधंदे यांचा नफा व कर याच्यावरोवर घालण्याची वेळ आलेली आहे.

थोडक्यात म्हणजे Integrated policy of prices of essential commodities, salaries, wages, self earnings, manufactured products व Taxes ही आखली गेली पाहिजेत, तरच आपल्या देशात शांतता नांदून त्याचे स्वातंत्र्य अबाधित राहील.

श्री. शरदरावानी कांद्यास किलोला एक रुपया व उसाला टनाला तीनशे रुपये आधारभूत भाव मागितला आहे त्याची कारणेही त्यानी त्याच्या 'वारकरी' या साप्ताहिकात दिली आहेत. त्याला उत्तर स्वतः २५ वर्षे ऊस व अन्य पिके काढणाऱ्या श्री.मायदेव यांनी तरुण भारत मध्ये दिले आहे. श्री. जोशी हे संख्याशास्त्रज्ञ, उच्च विद्याविभूषित, चारित्र्यवान, त्यागी, अनेक वर्षे परदेशात राहून तेथील परिस्थितीचा अभ्यास केलेले, देशप्रेमी, परदेशी उसन्या विचारसरणीला न विकलेले व शेतीचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेले शेतकरी आहेत. शास्त्रीय दृष्टिकोनातून त्यानीही त्याच्या मागणीचा व एकंदर शेतीविषयक भाव-धोरणाचा पुर्नविचार करणे आवश्यक आहे.

उसाचा जो काही भाव ठरेल त्यावर, साखरकारखान्याची कार्यक्षमता, ऊस व साखर यावर असलेले सरकारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर या सर्वांची क्रिया–प्रतिक्रिया होऊन साखरेचा अखेरचा भाव ठरणार. प्रस्तुत लेखकालाही उसाच्या लागवडीचा व साखारकारखान्यातील कामाचा थोडा अनुभव आहे. तेव्हा शेतकऱ्याला, कारखान्याला व ग्राहकाला परवडतील अशा दृष्टीने उसाचा भाव ठरवला गेला पाहिजे. या दृष्टीने विचार केला असता काही गोष्टी सुचतात.

उसाची लागवड मुख्यतः मध्य–दक्षिण भारतात केली पाहिजे. साहजिकच तेथे साखरकारखानेही निघावेत. उसाचे एकरी किमान उत्पन्न किती असले पाहिजे हे ठरविले गेले पाहिजे. त्यापेक्षा कमी उत्पन्न जर लागोपाठ तीन वर्षे आले तर त्या शेतकऱ्याला ऊस लावण्याची परवानगी देऊ नये.

शेतीकरिता लागणाऱ्या आवश्यक अशा रासायनिक खते, पेंड, लोखंडी अवजारे, सिमेंट, पन्हळी पत्रे, वीज, क्रूड ऑइल वगैरेचे शेतकऱ्याकरिता कमाल भाव ठरवून ते त्याला त्या भावात उपलब्ध होतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

साखरकारखाना व त्याला ऊस पुरविणारे क्षेत्र यामध्ये अद्वैत उत्पन्न होऊन कारखान्याला जास्तीत जास्त साखर देईल असा ऊस गळिताच्या संपूर्ण हंगामात मिळत राहील अशी व्यवस्था झाली पाहिजे. सहकारी तत्त्व जोपासून शेतकऱ्याचे स्वतंत्र अस्तित्व टिकवून ही व्यवस्था करण्याचा मार्ग शोधला पाहिजे. पूर्वी कारखान्याचा स्वतःचा मळा असे. त्या वेळी कारखान्याला गळिताच्या संपूर्ण मोसमात, एकरी जास्त उत्पन्न, व साखरेची जास्त टक्केवारी देणारा ऊस मिळत असे. आता कारखान्याची यंत्रसामुग्री, उसाच्या नवनवीन जाती, उसाच्या लागवडीकरिता लागणारी यंत्रसामुग्री व शेतीविषयक शास्त्रीय ज्ञान यामध्ये खूपच प्रगती झाली आहे. तेव्हा दर एकेरी साखरेचे प्रमाण नक्कीच जास्त मिळाले पाहिजे पण हल्ली साखरकारखाना व ऊस पुरविणारा शेतकरी हे द्वैत झाल्यामुळे साखरेच्या एकरी उत्पन्नात अपेक्षित वाढ झालेली नाही. म्हणून सहकारी साखरकारखाना व शेतकरी याचे अद्वैत होण्याची आवश्यकता आहे.

उसाच्या जातीत व लागवडीत सुधारणा करण्याकरिता प्रांतिक व केंद्र सरकारने ऊस व साखरेवर भरमसाठ कर लादले आहेत. आज

करापासून कोटयवधी रुपयांचे उत्पन्न सरकारला मिळते; पण त्याचा उपयोग ऊसशेतकऱ्याला व साखरकारखान्याला फार थोडा होतो. या करात बरीच मोठी कपात झाली पाहिजे.

कारखान्यात जाणाऱ्या प्रत्येक टन उसापासून जास्तीत जास्त साखर कशी मिळेल इकडे कारखान्याचे संचालकमंडळ, ज्येष्ठ अधिकारी व अन्य कर्मचारी याचे लक्ष असेल हे पाहिले पाहिजे. तसेच दर टनी उसाचे गाळप व साखरेचा उतारा याच्या वाढीनुसार कारखान्यातील कर्मचाऱ्याना उत्तेजन-बोनस मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. संघटित शास्त्रीय प्रयत्नांनी प्रत्येक टन उसातून १½ ते २ किलो साखर नक्कीच जास्त मिळू शकते. फक्त यामुळेही दररोज बाराशे टन ऊस गाळप करणाऱ्या कारखान्याला नऊ-दहा लाख रुपये जास्त मिळतील.

एकदर साखरेचे उत्पन्न ६० लाख टन धरले तर त्याची पोती होतात सहा कोटी. प्रत्येक पोत्यामागे दीड किलो साखर जास्त म्हणजे नऊ कोटी किलो किंवा नऊ लाख पोती, म्हणजेच ९०,००० टन साखरेचे उत्पादन जास्त होईल. एका पोत्याला पाचशे रुपये या हिशोबाने ही किमत साडेचार कोटी होते. याचा उपयोग साखरेचा भाव कमी करण्यात निश्चित करता येईल.

कारखान्याला लागणारे यंत्रसामुग्रीचे सुटे भाग, तयार होणाऱ्या साखरेवर कडक देखरेख, Over Staffing ला प्रतिबंध, हे सर्व अंमलात आले पाहिजे.

ऊस व साखर या उत्पादनात एक प्रकारचे सात-आठ वर्षांचे दुष्टचक्र दिसते. गेल्या दोन-तीन दशकात हे नजरेस आले आहे. उदाहरणार्थ, १९७२ ते १९७५ या वर्षांत साखरेचे उत्पादन समाधानकारक नव्हते, पण त्यानंतर १९७६-७७,-७७-७८-७९-७९ या तीन वर्षांत साखरेचे उत्पादन चागले आले होते, त्या वेळी केंद्रशासनाला दहा-पंधरा टन साखरेचा राखीव साठा सहज करता आला असता व त्यामुळे वाढत्या भावावर नियंत्रण ठेवता आले असते; पण वारंवार सूचना मिळूनही केंद्र सरकारने काहीच केले नाही व उलट साखरेचे नियत्रण पूर्णपणे काढून टाकले. परिणामतः साखरेचे भाव अवाजवी उतरले व साखरकारखाने गोत्यात आले. ते शेतकऱ्याना आवश्यक तो भाव देऊ शकले नाहीत व त्यामुळे शेतकऱ्यानी पुढील वर्षी उसाच्या लागवडीत खूप कपात केली. त्यामुळे साखरेचे उत्पन्न ७९-८० मध्ये एकदम घटले व चालू हगामातही फार मोठी सुधारणा होण्याची आशा नाही.

गेल्या २-३ वर्षांत ऊसलागवडीच्या खर्चात खूपच वाढ झाली व यदा तर ही वाढ शिगेला पोचली. त्यातूनच ऊसभाववाढीचे आदोलन उभे राहिले.

आज साखरेच्या धद्यात अनिष्ट व गलिच्छ राजकारणाने भाऊगर्दी केलेली आहे.

१९७७ ते ८० या काळात साखरेचे भाव उतरले असता दिवसाढवळया खूप चढया भावाने लक्षावधी टन साखरेची बागला देश, पाकिस्तान व आखाती प्रदेशात निर्यात करून करोडो रुपयाचा फायदा काही जणानी केला, अशी वंदता आहे. भारतातील अनेक वर्तमानपत्रामधूनही याबद्दल माहिती आली; पण सरकारने काहीही खुलासा केला नाही व या बातमीला विरोधही केला नाही,

गेल्या काही महिन्यात महाराष्ट्रातील कारखान्यांनी खुल्या साखरेच्या भावावर ऑन मनी घेऊन काळया बाजारात अक्षरशः करोडो रुपये मिळविले, पण आमच्या केंद्र व राज्य सरकारने याबाबत ब्र ही काढला नाही. 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' या अब्जावधी रुपयाचे वाटप कसे झाले असेल हे एखादा अशिक्षित खेडूतही समजू शकतो. हा अधःपात पाहून, विरोधी पक्ष तर जाऊच द्या, पण आमच्या सुशिक्षित तरुण पिढीलाही काही वाटले नाही, वा एकाही कारखान्याला ही ऑन मनी ओकण्यास कोणी भाग पाडले नाही.

श्री. शरदरावानी उसाचा भाव टनाला तीनशे रुपये मागितला आहे, तो ऊस मळापोच का कारखानापोच याचा खुलासा करणे आवश्यक आहे. कारण तोडणी व वाहतूकखर्च सुमारे ४८ ते ५० रुपये येतो. म्हणजे भाव कारखानापोच असल्यास शेतकऱ्यांच्या हातात जेमतेम अडीचशे रुपये पडतील.

आणखी एक गोष्ट श्री. जोशी यांनी लक्षात घेणे अवश्य आहे. आतापर्यंतच्या सर्व वक्तव्यात त्यांनी शेतकरी व शासन याचाच विचार केला, पण शेवटी साखर वापरणारा ग्राहकवर्ग याचाही विचार त्यानी करणे आवश्यक आहे. भारतातील चाळीस टक्के ते साठ टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली जगत आहे. खरा धनवानवर्ग दोन-तीन टक्के असेल की ज्याच्या साखर-खरेदीवर चढया भावाचा परिणाम होणार नाही. राहिलेला मध्यमवर्ग दारिद्र्यरेषेच्या थोडा वर आहे.

या लेखकाच्या एका मित्राने गेल्या दोन-चार आठवडयात सुमारे दोनशे मध्यमवर्गीय कुटुबाना भेट देऊन साखरेच्या भावाबद्दल चर्चा केली. ८१ गृहिणींनी स्पष्ट सागितले की त्यांनी शिधापत्रिकेवरील साखरेवरच यंदाची दिवाळी साजरी केली. १०८ गृहिणींनी सागितले की दिवाळीसाठी यंदा त्यानी प्रत्येकी दोन-तीन किलो साखर, चढया भावाने खुल्या बाजारात खरेदी केली. चार गृहिणींनी सांगितले की त्यानी दिवाळीकरिता पाच-सहा किलो साखर खुल्या बाजारात खरेदी केली व राहिलेल्या सात गृहिणींनी सागितले की दराचा विचार मनात न आणता त्यानी लागली ती सर्व साखर खुल्या बाजारात खरेदी केली. या सात जणींपैकी तिघीकडे जावईबापूंचा दिवाळसण होता !!!

केंद्र शासनाने साखरविक्रीधोरणाबद्दल काही गोष्टी जाहीर केल्या.

१) शिधापत्रिकेवर मिळणाऱ्या साखरेच्या किंमतीमध्ये किलोमागे ६५ पैशांची वाढ केली. (याती एक पैसासुद्धा ऊसशेतकऱ्याला भावापोटी मिळणार नाही.)

२) शिधापत्रिकेवरील साखर व खुली साखर याचे प्रमाण पूर्वीप्रमाणेच ६५ . ३५ असे राहील.

३) ८.५ टक्के साखरउतारा असलेल्या उसाचा एका टनाचा भाव १६० रुपये राहील.

महाराष्ट्रात गतवर्षी साखरउताऱ्याची सरासरी १०.६ टक्के होती. या भावाने शेतकऱ्याला एका टन.ला कारखानापोच भाव सुमारे दोनशे रुपये मिळेल. त्यामुळे तोडणी व वाहतूकखर्च वजा जाता शेतकऱ्याच्या पदरात टनाला सुमारे दीडशे रुपये पडतील. म्हणून श्री. जोशी यानी एका टन ला तीनशे रुपये हा भाव ऊसमळा क. कार-

खानागोच हे स्पष्ट केले पाहिजे वहुतेक हा भाव कारखानापोच असावा.

१ उसाला कारखानापोच भाव रु ३००।– (साखरउतारा १०%)

२ शिधापत्रिका व खुल्या साखरेचे प्रमाण ६५.३५

३ कारखाना तोटयात चालवायचा नाही.

या सर्व गोष्टी गृहीत धरल्या तर खुल्या बाजारातील साखर एका किलोला दहा-अकरा रुपयाच्या खाली विकावयास परवडणे शक्य होणार नाही. ह्या भावाने किती जणाना खुल्या भावात साखर घ्यावयास परवडेल याचा विचार श्री. शरद जोशी व त्याच्या सह्कान्यानी करावा असे वाटते.

अर्थात साखरकारखान्यात उत्पन्न होणाऱ्या मळीपासून Power alcohal उसाच्या सालीपासून मेण व चिपाडापासून कागद या वस्तू जर प्रत्येक कारखान्याने वा कारखानागटाने केल्या तर त्यातून मिळणाऱ्या फायद्यातूनही साखरेची किंमत निदान दहा टक्के कमी करता येईल. अन्य देशात उसाच्या चिपाडापासून कागद बनविण्याच्या तत्रात सशोधन होऊन आता तिथे चिपाडापासून चागला उपयोगी कागद बनविला जातो व त्याला किंमतही चागली मिळते. हे तंत्र (Knowhow) परदेशातून विकत मिळविले पाहिजे किंवा सर्व साखरकारखान्यानी एकत्र येऊन हे संशोधन केले पाहिजे.

याशिवाय दहा टक्के साखर असलेल्या उसाला एक टनाला कारखानापोच भाव २५० रुपये व शिधापत्रिका व खुली साखर याचे प्रमाण ४५.५५ या दोन गोष्टी श्री. जोशी व केंद्रशासन याना मान्य झाल्यास खुल्या बाजारातील साखरेचा भाव सात रुपये किलोपर्यंत किंवा थोडा आणखीही उतरेल. शिधापत्रिकेवरील साखरेचा भाव सरकारने पूर्वनिश्चित केलाच आहे.

गेल्या तीस वर्षांत आपले उद्योगधदे, वाहतूक, शेती, संरक्षण-व्यवस्था, शिक्षण, कुटुबस्वास्थ्ययोजना, बँकिंग वगैरे महत्त्वाच्या बाबी राजकारणाच्या फेन्यात गुरफटल्या आहेत. या सर्वांचे बाबतीत आपले राष्ट्रीय धोरण नव्याने ठरविण्याची वेळ आता आली आहे. शासन कोणत्याही पक्षाचे असो, या धोरणात मूलभूत बदल चालू शासनाला तरी करता येणार नाही असे ठरविले पाहिजे.

उत्पादनात वाढ व त्याकरिता सर्व उपाय योजणं,

आसामचा प्रश्न त्वरित मिटविणे,

सरक्षण व वाहतूकव्यवस्था भक्कम करणे,

शिक्षणात योग्य तऱ्हेने वाढ व सशोधनाला भक्कम पाठिंबा,

श्रीमत व गरीब यातील फरक वाढत्या प्रमाणात कमी करणे, इत्यादी कामे वेगाने व निर्विघ्नपणे पार पाडली पाहिजेत.

भारतात बुद्धी, मनुष्यबळ, कच्चा माल, निसर्गदत्त पाणी याची तूट नाही. स्वार्थी शासनाने या गोष्टी स्वत च्या फायद्याकरिता राबविल्या व आपल्या तुबड्या भरभरून घेतल्या.

हा सर्व बदल शाततेने व लोकशाही मार्गानेच झाला पाहिजे. हे होत असताना राष्ट्रीय संपत्तीची नासधूस व मोडतोड होत नाही ना हे डोळयात तेल घालून पाहिले पाहिजे आपला भारत सुजला, सुफला व सोन्याचा मौल्यवान तुकडा आहे. आजच्या राज्यकर्त्यांनी त्याच्या वाझोटया, स्वार्थी धोरणाने त्याला वैराण, स्वाभिमानशून्य, लाचार व गंजलेल्या लोखंडासारखे केले. आता त्यागी, ज्ञानी, कष्टाळू नव्या पिढीने हे सर्व बदलले पाहिजे. आज ना उद्या हे होणार ही काळया दगडावरची रेघ !

श्री. शरद जोशी यानी कादा व ऊसशेतकऱ्याला जागे केले त्याबद्दल त्याचे आभार मानले पाहिजेत; पण आता हे लोण येथेच थाबणार नाही. इतके दिवस पेंगुळलेला शेतकरी आता नजीकच्या भविष्यकाळात ताठ मानेने म्हणणार, ' मला मनुष्यासारखे मानाने जगावयाचे आहे. भारतातील सत्तर टक्के जनता शेतीधद्याशी निगडित आहे. ही प्रचंड शक्ती स्वार्थी, अप्पलपोटया ढोंगी नेतृत्वाला पाचोळयाप्रमाणे उडवून लावील !

भारतासारखा साधनसंपत्तीने युक्त असा हा प्रचंड देश मेणाचा गोळा होऊन पडणे अशक्य. हे काम आजच्या तरुण पिढीने केले नाही तर उगवती तरुण पिढी करणारच. हा इतिहासक्रम व देववाणी आहे. मग चालू शेतकऱ्याच्या चळवळीच्या निमित्ताने हे काम आजच्याच तरुण पिढीने का हातात घेऊ नये ?

☐


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

कथा

# तिचा संसार

श्याम देशमुख

त्या गोष्टीला दोन दिवस होऊन गेले, पण नवऱ्याच्या त्या शब्दांनी तिच्या मनाची जी आग आग झाली, ती अजून जात नव्हती. एकदम फोडणीचा भपकन जाळ होऊन तोंडावर यावा, तसे तिचे झाले होते. त्याच तिरमिरीत ती नवऱ्याला म्हणाली होती,

"– तरी दोन पोरं बांधलीत माझ्या गळ्यात तुम्हीच !"

अशा शब्दांनी वरमणाऱ्या लोकांपैकी तिचा नवरा नव्हता. खी खी हसत तो म्हणाला,

"त्याला किती वर्षं झाली, सांग की तूच. धाकटा झाला चार वर्षांचा. आणि त्याचं काय, रात्रीच्या अंधारात..."

त्याचे पुढचे शब्द ऐकायला ती त्याच्यासमोर थांबलीच नाही, पण त्या दोन लहान खोल्यातून ती जाणार कुठे? तशीच ती चाळीच्या तोंडाशी येऊन उभी राहिली.

हे शुक्लकाष्ठ लग्न झाल्यावर वर्षाच्या आतच तिच्यामागे लागले होते. तसे पाहिले तर समाधानाने रहायला तिच्या घरात काही कमी नव्हते. शहरातल्या एकुलत्या एक कारखान्यात तिच्या नवऱ्याला चांगली स्टोअर–कीपरची नोकरी होती. ओव्हर-टाइम वगैरे मिळून बऱ्यापैकी पगार घरात येई. त्याने लोन काढून हौसेने स्कूटरही घेतली होती.

पण तिच्या नवऱ्याची हाव जबर! त्याला सोफासेट हवा होता, फ्रीज हवा होता, नवीन कपडे तर नेहमीच लागत आणि या सगळ्याला त्याचा पगार अपुरा पडत होता, म्हणून त्याचा आग्रह होता की बायकोनेही नोकरी करावी. त्यामुळे घरात जास्त पैसा तर आलाच असता शिवाय त्याच्याच शब्दात म्हणजे, त्याचे 'प्रेस्टीज'ही वाढले असते. कारण त्याच्या मते नोकरी करणारी बायको म्हणजे एक मोठेच Status Symbol होते.

त्यामुळे लग्न झाल्यापासून वर्षाच्या आत त्याने बायकोमागे नोकरीला लागण्याची भुणभुण सुरू केली. तो अनेकदा आपण तिच्यापेक्षा जास्त रूपवान आणि ज्यादा हुंडा देणाऱ्या मुली नाकारून तिच्याशी ती केवळ बी. ए. होती म्हणून लग्न केले, हे तिला सांगत असे. म्हणजे त्या बी. ए. च्या जोरावर तिला पटकन नोकरी लागेल ही त्याची अपेक्षा; पण ह्या दिवसात नुसत्या बी. ए. ला कोण विचारतो? बी. ए च्या जोरावर तिला नोकरी कोण देणार? त्यातून चार–चौघी-सारखी घरकाम, पाठच्या भावंडांना सांभाळणे, आईचे आजार काढणे यातून ती रडत-खडत थर्ड क्लासमध्ये बी. ए. झाली होती.

मग त्याने तिच्यामागे टाइपिंग शिकून घेण्याचा लकडा सुरू केला. तेही तिने करून पाहिले, पण तिथे इंग्रजीचे तुटपुंजे ज्ञान आड आले. सराव नसलेल्या रस्त्यावरून आंधळ्या माणसाचे पाय धडपडावेत तशी इंग्रजी टाइपरायटरवर तिची काळसर हडकुळी बोटे धडपडत, ठेचकाळत. टाइपरायटरच्या आवाजाने तिचे डोके दुखू लागे. इंग्रजीतल्या वेगवेगळ्या शब्दांची स्पेलिंगे तिला गोंधळून टाकत. कटाळून नाइलाजाने तिने तो नाद सोडून दिला

मग नवऱ्याचे ऑफिस, दोन पोरांच्या आंघोळी, जेवणे, घरकाम, हे सगळे धावत-पळत सांभाळून शेजारच्या शहरातून ती धापा टाकत कशीबशी बी. एड. झाली आणि शिक्षिकेच्या नोकरीची वाट पहात राहिली.

कसले ते वाट पहाणे! नवऱ्याचे टोमणे, कुजकट बोलणे थांबत नव्हते माहेरच्या गरिबीचा उद्धार तर होतच होता, त्यातच तिच्या रंगारूपाची कुचेष्टा सुरू झाली. अधूनमधून येणारी सासू त्यात भर घालीत असे. तिला आपल्या मुलाचे कोण कौतुक! ती हिला म्हणे, तुला आम्ही नाकी–डोळी नीटस पण बारीक अंगाची असून करून घेतली. कारण वाटले होते, लग्नानंतर भरेल अंगाने. पण लग्नाला इतकी वर्षं झाली, तरी ही आपली धुणं वाळत घालायच्या काठी-सारखीच राहिली! लोकांना वाटले, हिला नवरा घरात जेवा–खायला घालतो की नाही. कोण जाणे!

सासूपुढे बोलायची तिची प्राज्ञा नव्हती; पण मनातल्या मनात ती म्हणे, कसले काय जेवणे आणि खाणे. वाघाच्यासमोर बकरीला बांधून तिच्यापुढे ढीगभर चारा घालण्या-सारखे होते ते! ती दोन घास कमी जेवली तर 'का ग बाई बरं नाही का तुला? असे विचारणारे कोणी नव्हते. तिला नोकरी लागली की आपला खरा संसार सुरू होईल असे तिचा नवरा तिला सांगत असे वारंवार हे ऐकून ती अगदी रजीस झाली होती.

म्हणून दोन दिवसापूर्वी लोकल पेपरमध्ये 'जिल्हा परिषदेच्या शाळेसाठी शिक्षिका पाहिजेत', अशी जाहिरात पाहून तिच्या डोक्यात असंख्य भिरभिरी फिरू लागली होती. ती जाहिरात परत परत तिच्या डोळ्यासमोर फडफडू लागली शेवटी लिहिले होते गरजूंनी हो, गरजूंनीच, आपले अर्ज-जि. परिषदेचे अध्यक्ष × × × यांच्याकडे द्यावेत. खाली त्याचे नाव होते पी डी. दाबके.

त्या शाळेतल्या नेमणुका आणि साऱ्या बडामोडी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या मर्जीनेच होत. जीपमधून इकडे तिकडे जाताना तिने त्यांना लांबून पाहिले होते. एरवी मातृभाषेतूनच बोलणारे गावातले टवाळ लोक त्यांना पाहिले की एकदम राष्ट्र-भाषेचा आश्रय घेऊन म्हणत, 'दाबके आये!' आणि वर फिदीफिदी हसत.

त्या शाळेतल्या काही शिक्षिकांनाही तिने कधीमधी पाहिले होते दोघी–तिघींच्या ग्रुप-मध्ये असल्या तर दाबक्यांची जीप पाहून त्या एकमेकींना डोळे घालत, कोपरखळ्या मारत आणि कुजबुजत बोलत. भडक पातळे नेसून तोंडभर फसाफसा पावडर लावून मोठ्या आवाजाने गप्पा करत. त्या गटा-गटाने गावाच्या रस्त्यावरून जात, तेव्हा गावाचा राजा असलेल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे आपण कृपा–पात्र आहोत हे लप-वण्याची त्यांना गरज वाटत नसे. कदाचित ना धड खेडेगाव, ना धड शहर अशा अर्ध-वट वळणाच्या त्या गावी अशा गोष्टी लप-वूनही लपवल्या जाणार नाहीत हे त्यांना मनोमन पटले असावे.

हे सर्व तिला आठवले आणि तिच्या तोंडाला कोरड पडली. आपला या सर्वात

कसा काय निभाव लागणार हा प्रश्न तिला परत परत सतावू लागला.

तिला रहावले नाही तशी त्या दिवशी संध्याकाळी बळेच हसून तिने नवऱ्याला विचारले,

'जाहिरात पाहिलीत का ती ? इथल्या शाळेतली ?'

'पाहिली की !' पान चघळत तिच्या नवऱ्याने उत्तर दिले.

ती धीर करून म्हणाली, 'टाकू का अर्ज ?'

मनाच्या एका कोपऱ्यात तिला आशा वाटत होती की नवरा म्हणेल, 'काही नको तिथे अर्ज टाकायला. तो दावके कसला माणूस आहे, साऱ्या जगाला ठाऊक आहे ! किती बायकांशी त्याच्या भानगडी आहेत !!'

पण तिचा नवरा तिच्या तोंडाकडे बघत हसायलाच लागला. हंसणे थांबले, पानाची पिंक टाकून झाली तसा कमालीच्या तुच्छतेने म्हणाला,

'तू तिथे अर्ज टाकून काय होणार ? तू ही अशी ! अशक्त, हडकुळी–पिळून टाकलेल्या लिंबासारखी–तुला भाडेवाली म्हणून तरी ठेवील का तो अध्यक्ष ? तुझ्याजवळ आहे काय ...'

कुणी तरी चरचरून तापल्या पळीने डाग द्यावा, तसे तिला झाले. आणि दोन दिवस होऊन गेले तरी तिच्या मनाची आग थांबेना. ¤

आणि मग तिच्या मनाने एकदम पलट खाल्ली. या असल्या नवऱ्याला काय म्हणावे, ते कळेना. स्वतःबद्दल वाटू लागलेली कीव सहन करवेना आणि नवऱ्याला अद्दल घडवावी, हे सारे संस्कारांचे ओझे झुगारून द्यावे, असे तिला सर्वस्वी अपरिचित बंडखोर विचार मनात घोंगावू लागले.

मनाच्या त्या अवस्थेतच सुचेल तशा नोकरीसाठी अर्ज लिहून, मनाची पक्की तयारी करून ती दुपारी चार वाजता गावाबाहेरच्या अध्यक्षाच्या बंगल्याकडे निघाली. पांढरपेशावर्गाला शोभेल असा जामानिमा करायला ती विसरली नाही. तिच्या जवळची सर्वात चांगली साडी, मॅचिंग ब्लाऊज, पावडर, काजळ सारे काही जमवले. मनाचा हिय्या केला.

ती बंगल्यापाशी आली आणि क्षणभर फार बावरली. अपरिचित माणसाकडे आपल्या कामासाठी भेटायला जाण्याचा हा तिचा पहिलाच प्रसंग होता ज्याला भेटायला जायचे, त्या माणसाची कीर्ती खुद्द नवऱ्याच्या तोंडूनच तिने ऐकली होती.

गोंधळणाऱ्या मनाला दडपून ती पुढे सरकली. बंगल्याच्या दर्शनीच एक खुला वऱ्हाडा होता, त्यात दोन वेताच्या खुर्च्या दिसल्या. बाहेर पेंगणाऱ्या घरगड्याला तिने 'साहेबाना भेटायचंय', असे सांगताच त्याने तिच्याकडे सराईत नजरेने रोखून पाहिले आणि तो आत गेला.

पाचच मिनिटानी बाहेर येऊन त्याने तिला बसायला सांगितले.

तिला फार वेळ वाट पहावी लागली नाही. दहा–पंधरा मिनिटांनी दावके आले आणि तिच्या समोरच्या दुसऱ्या खुर्चीत बसले. इतक्या जवळून ती त्याना प्रथमच पहात होती.

दावके दिसायला प्रेक्षणीय खरेच ! चांगला उंचापुरा पोसलेला देह, मूळचा निमगोरा पण उन्हात हिंडल्याने आता तांबूस झालेला रंग, तरतरीत नाक, हिरवट, निळसर डोळे, दाट काळे केस असे त्याचे रूप होते. देह थोराड होता. पांढरे स्वच्छ पायघोळ धोतर आणि आत बनियन न घालता वर घातलेला कुडता–मलमलचा कुडता, असा त्याचा वेष होता. त्या तलम कुडत्यातून सहाजिकच त्याची रुंद, भरदार, गोरीपान केसाळ छाती दिसत होती, त्यावर जाडसर सोन्याचा गोफ रुळत होता. त्याचे वय चांगले पंचेचाळीसच्या आसपास असावे.

क्षणभर त्यानी तिच्याकडं कुतूहलाने पाहिले. त्याची नजर तिला गढूळ वाटली नाही; पण स्वच्छही वाटली नाही. सारी दैहिक सुखं पुरेपूर भोगलेल्या, भोगणाऱ्या पुरुषाचा मोकळा धीटपणा त्यात होता.

त्यानी तिला नाव विचारले आणि काय काम होते ते पण विचारले. ते ऐकून ते गप्प राहिले. आतून धुण बडवल्याचा तेवढा आवाज ऐकू येत होता.

"शिक्षिकेच्या कामाचा काही अनुभव आहे का तुम्हाला ?" त्यानी शांतपणे विचारले.

"नाही." तिचे खाली मानेचे उत्तर. तिला वाटले त्याच्या डोळ्याशी डोळा भिडवून म्हणावे, "तुम्ही दिली नोकरी तर मिळेल की अनुभव." पण तेवढे धाडस तिला झाले नाही परक्या अपरिचित पुरुषाशी बोलण्याचा तिचा हा पहिलाच प्रसंग होता.

पाच मिनिटानी उठून आत जात ते म्हणाले, 'या, आत या अशा !"

त्याच्या पाठोपाठ उठून आपण आत कधी गेलो ते तिला कळलेच नाही. बाहेरच्या वऱ्हाड्याला समांतर अशी त्याला लागूनच ही अरुंद खोली होती. खोलीत एक उंचसं स्टूल, त्यावर टेबलफॅन, त्याला लागून एक आरामखुर्ची, आणि आरामखुर्चीला जोडूनच एक लाकडी विशेष रुंद नसलेला पलंग होता खिडक्या नसल्याने खोली जरा अंधारीच होती.

आत आल्यावर दावक्यानी टेबलफॅन सुरू केला, पलंगाच्या वरची, गादी खालून सतरंजी काढली आणि ती जमिनीवर अंथरून त्यावर बसण्याची त्यानी तिला खूण केली. घरातल्या आतल्या भागात जाण्यासाठी बाजूला असलेले खोलीचे दार त्यानी बंद करून घेतले.

त्यामुळे जे घडले, ते सारे तिला अपेक्षितच होते. त्याला सामोरे जाण्याच्या तयारीनेच तर ती आली होती.

मात्र तिथून घरी परत येताना तिची फार चमत्कारिक अवस्था झाली होती. पश्चात्ताप मुळीच होत नव्हता, कसलीही रुखरुख, हुरहुराही वाटत नव्हती. आनंदाची अनुभूती घेतल्यासारखेही वाटत नव्हते. वाटत होते थोडे नवल आणि थोडे कुतूहल. पश्चात्ताप वाटत नसल्याचे स्वत:विषयी नवल आणि दावक्यांच्याबद्दल कुतूहल. त्या सगळ्या व्यवहारात दावके काही बोलले नाहीत. डॉक्टरने तपासणीसाठी कपडे वर करावे, तसे त्यांनी तिचे हवे तिथले कपडे बाजूला केले. स्वतः हवे ते साधन वापरण्याची त्यानी दक्षता घेतली (न बोलता), स्वत:ला हवे होते ते त्यानी सराईतपणे घेतले. अगदी विनबोभाटपणे. त्यातही तिला एक अलिप्तपणा जाणवला. त्यानी तिला कुरवाळले नाही, हर्षे हर्षे हसत 'तुम्ही आमचं काम करा, मग आम्ही तुमचं काम करतो.' असा सस्ता फिल्मी चहाटळ संवाद म्हटला नाही. खरं म्हणजे ते

फारच थोडं बोलले. तिने काही विरोध केला नाही, ह्याचेही त्यांना नवल वाटलेले दिसले नाही.

सगळं उरकल्यावर ते तिच्यासह बाहेरच्या व्हराडयात परत आले, गड्याला त्यांनी चहा पाठवायला सांगितला. तिला चहा-बिस्किटे देऊन दोन-तीन दिवसांनी परत या, तेव्हा काय ते सांगेन अशा शब्दात तिला निरोप दिला.

आपल्या संसारात परत आल्यावर मात्र तिची चमत्कारिक अवस्था संपून तिला थोडा अभिमान वाटला. नवऱ्याच्या अपमानास्पद शब्दाची आठवण झाली. तो म्हणाला होता, 'तुझ्याजवळ आहे काय दावक्याना देण्यासारख ?' हे शब्द न उच्चारताही त्याने धडधडीत स्पष्ट केले होते.

ते शब्द ऐकून वाटणारी आपण अगदी उष्टया-खरकटयासारख्या आहोत, ही भावना आज गेली होती. गावातल्या सगळ्यात धनवान, सामर्थ्यवान, शक्तिशाली पुरुषाने आपल्याला जवळ केले, ही भावना तिला सुखवू लागली. स्वतःबद्दल थोडे कौतुक, थोडा अभिमान वाटू लागला त्या दिवशी खूप दिवसानी तिने मन लावून स्वयंपाक केला.

आणि दोन दिवसांनी ती परत दावक्याच्या बंगल्यावर गेली. वेळ सकाळी नऊची. याही वेळी सगळे गेल्यावेळेसारखेच घडले. सकाळची वेळ होती म्हणून काही कशात फरक नाही. तीच आतली खोली, तीच सतरंजी, तेच दावक्यांनी साधन घेणे आणि यातूनही दावक्याचा तो अबोल सराईतपणा आणि अलिप्तपणा. शब्द अगदी माफक आणि शेवटी चहाऐवजी सरबत आणि ग्लुकोजची बिस्किटे. जाताना त्यांनी तिला इंटरव्ह्यूची तारीख सांगितली.

त्या दिवशी ती रमतगमत बाजारातून घरी परतली. मन उल्हसित होते. आयुष्यात पहिल्याप्रथम आत्मविश्वास वाटत होता. गाणे गुणगुणावेसे वाटत होते; पण सुचत नव्हते. कारण क्षणोक्षणी आठवत होता दावक्याचा अबोलपणा, अलिप्तपणा. कुलुप उघडताना एकदम डोक्यात वीज चमकावी तसे तिला आठवले.

दावक्यांनी तिला काहीच मागितले नव्हते तसे तिला नोकरी देण्याचे आश्वासनसुद्धा दिले नव्हते. तिच्या कामाबद्दल, तिच्याबद्दल काडीइतकेही औत्सुक्य त्यांनी दाखवले नव्हते. त्यांच्या त्या संपूर्ण आत्मकेंद्रित स्वयंतुष्ट वागण्याची आठवण होऊन ती थोडी भ्यायली. इंटरव्ह्यू होऊन तीन आठवडे लोटले, पण तिला काही कसले पत्र वगैरे आले नाही. त्याच शाळेत शिकणाऱ्या शेजारच्या मुलीकडून शाळेत तीन नवीन शिक्षिका लागल्याचे कळल्यावर मात्र ती कमालीची हादरली. एका विलक्षण ईर्षेने पेटून ती शाळेच्या मुख्याध्यापिकेला भेटायला गेली.

मुख्याध्यापिकाबाईंनी तिला थंडपणे सांगितले की तिला अनुभव नसल्याने आणि तिच्यापेक्षा जास्त लायक उमेदवार असल्याने तिची निवड होऊ शकली नाही. तिच्या डोक्यात प्रकाश पडायला वेळच लागला. तीनदा तेच तेच सागूनही ती हटेना, तेव्हा मुख्याध्यापिकाबाईंनी त्रासून तिला जवळजवळ हुसकावूनच लावले.

शाळेतून बाहेर पडून ती गावाबाहेरच्या माळरानावर आली हा धक्का हादरून टाकणारा होता, त्याने ती भेदरली, सुन्न झाली. परत परत तिच्या मनात प्रश्नाचा गुंता वाढत राहिला. हे असे कसे झाले ? दावक्यानी आपल्याला जवळ तरी का केले ? त्याचा तिला राग येईना आणि शिव्या-शाप देणे तर तिला सुचलेच नाही. त्याना आपला मोह पडावा असे आपल्यात काही नसूनही त्यानी आपल्याला जवळ केले, एकदा नव्हे दोनदा आणि मग भिरकावून दिले ? शाळेतल्या शिक्षिकाच नव्हे तर दवाखान्यातल्या नर्सा, आया, गावात नव्याने आलेली एखादी तरुण, नीटनेटकी भाजीवाली, त्यानी हवं त्याना हाताळले होते, चोरटे सुख घ्यायला ते हपापलेले नव्हते आणि आपल्याला नोकरी देणे त्याना कठीणही नव्हते. मग ? मग ? ?

रात्रीचा उरलेला भात विटलाय का ते पहायला थोडासा तोंडात टाकावा, तसे आणि तेवढेच त्यानी आपल्याला जवळ केले आणि भात विटलाय म्हणून टाकून द्यावा, तसे फेकून दिले ! आपण केवळ उष्टया-खरकटयासारख्या आहोत ही मनाला छळणारी भावना परत तिला गिळू लागली. आपल्या जवळचे जे सगळ्यात मूल्यवान होते, ते आपण अटीतटीने, जिद्दीने पणाला लावले आणि ते उष्टया-खरकटयासारखे दीड दमडीचे ठरले! नवऱ्याला आपण अद्दल घडवायला गेलो आणि आपल्यालाच अद्दल घडून तोंडघशी पडलो, ह्या पूर्ण हताश करणाऱ्या जाणिवेने तिने माळावरच्या मातीवर डोके टेकले !

---

## नवीन आलेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. सुबोध भृगुसंहिता (ज्योतिष) | रु. | १६०–०० |
| २. कोसबाडच्या टेकडीवरून (चरित्र) : अनुताई वाघ | ,, | ३०–०० |
| ३. दीपगृह (वि. स. खांडेकर यांचा पत्रसंग्रह) : वि. वा. पत्की | | |
| ४. पु. ल.चा नाटचप्रवास मुकुंद टेकाडे | ,, | १०–०० |
| ५. एकेक पान गळावया (कथासंग्रह) : गौरी देशपांडे | | |
| ६. एकलकोंडा (कादंबरी) : आनंद यादव | ,, | १२–०० |
| ७. आर्य (चाणक्यावरील कादंबरी) . वसंत पटवर्धन | ,, | ७५–०० |
| ८. देवाची घंटा (कादंबरी) : ह. मो. मराठे | ,, | २२–०० |
| ९. लंडनची पत्रे (प्रवासवर्णन) ना. ल. वैद्य | ,, | २५–०० |
| १०. शोध (कथासंग्रह) . सानिया | ,, | १२–०० |

☐ Raging inflation has changed your life-style. Change the life-style of books too. Carry them in a clean closed bag. Listen to an experienced Librarian when he tells you how to handle books.

THE PHOENIX LIBRARY

727, Near Sadashiv Peth Post, Pune–30


आपण एक आदर्श कुटुंब-वत्सल पालक व्हा !
आपल्या कुटुंबाविषयी जिव्हाळयाचे भान राखा. आजच त्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी तरतूद करा याच क्षणी. आयुर्विम्याविषयी निर्णय घ्या. आयुर्विम्याच्या पॉलिसी काढून आपल्या मुलांच्या शिक्षणाच्या, विवाहाच्या आणि अर्थार्जनाच्या गरजा भागवा. आपला स्वतःचा आयुर्विमा आपल्या कुटुंबाच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी पुरेसा आहे किंवा काय याची खात्री करून घ्या. यासाठी एकच उपाय··· आयुर्विमा एजंट अथवा आयुर्विमा महामंडळाच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.
भारतीय आयुर्विमा महामंडळ
आयुर्विम्याला पर्याय नाही

LIC-102-MR

'समम बोनम'

# जी. ए. कुलकर्णीची सोयाबीन–सपक ' अमृतफळे '

प्रा. गोपाळ दत्त कुलकर्णी

मी जी. ए चा फॅन आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे मीही स्वत ऑस्कर वाईल्डच्या परीकथाचा (प्रेमाची फुले) अनुवाद केला आहे यापूर्वी जी. एं. च्या कथा अपार कौतुकाने वाचणाऱ्यांपैकी एक असल्यामुळे मी 'अमृतफळे' वाचायला घेतली, परन्तु प्रत्येक प्रौढाला जशा व जितपत बालकथा आवडाव्यात तेवढ्या त्या मला आवडल्या,पण हा अनुवाद करण्यासाठी (प्रिय मुग्धासाठी–ही खेळणी तुझ्यासाठी ) जी ए. ची गरज होती असे नाही. गावस्कर किंवा ब्रॅडमन याची न जमलेली इनिंग्ज अथवा कुमार किंवा भीमसेनची रमलेली मैफील जशा कौतुक पावतात, तेवढे कौतुक कदाचित 'अमृतफळा'ना लाभेलही.

लिआं सुमेंलिआ हा नावाचा (इंग्रजी न वाटणारा) परतु प्रकाशक ( जॉर्ज ॲलन ॲण्ड अन्विन) इग्रज लाभलेल्या कथाकाराच्या' ॲपल ऑफ इम्मॉरटॅलिटी' ह्या कथासग्रहातील काही कथाचा हा जी. ए. प्रणीत अनुवाद आहे. वास्तविक जी. एं. चा मला एवढा धाक आहे (आदरातून) की त्याच्या इतर कथासग्रहाची परीक्षणे लिहिण्याचा मोह मी बॉलपेनचे खटके दाबून वारंवार दाबून टाकला आहे. (मात्र चित्रकार सुभाष अवचटाच्या सुदर रेखाटनाचे श्रेय प्रत्यक्ष ग्रथपरीक्षणापूर्वीच देऊन टाकलेले बरे) कदाचित पट्टेदार वाघ प्रत्यक्ष शिकारीपूर्वी नख्याची बाभळी घालविण्यासाठी ती झाडाच्या बुध्यावर घासतो, तद्वत् पुढील स्वतंत्र सुदर कथा लिहिण्यापूर्वीची ही लेखनकामाठी असावी ऑस्कर वाईल्डने स्वत.च्या पुत्राला रिझविण्यासाठी बालकथा स्वत च लिहिल्या, जी. एं. नी कदाचित ( नातीसाठी) चि. मुग्धासाठी हा अनुवादप्रपंच केला असावा. आचार्य विनोबा म्हणतात त्याप्रमाणे प्रत्येक बऱ्यापैकी इग्रजी येणाऱ्याने भारतीय भाषामध्ये तरी एका इग्रजी ग्रंथाचा अनुवाद करावा, त्यासाठी जी ए कदाचित अभिनदनास पात्र ठरावेत. जी. एं. ची शैलीदार मराठी,जी इग्रजीपेक्षा त्याच्या कथामध्ये समर्थ व दमदार असते, तीही या अनुवादात आढळत नाही. कारणे दोन–एक म्हणजे तो अनुवाद असल्याने त्याला मर्यादा पडतात, दुसरी गोष्ट म्हणजे ह्या बालकथा आहेत अर्थात त्या बालकथा असल्या तरी त्या प्रौढासाठीही (सेन्सारच्या अर्थाने नव्हे ! ) आहेत. कारण प्रत्येक बालकथा ही ती सागणाऱ्या प्रौढासाठीही असते सांगितलेली कथा बालकांकरिता आणि अध्याहृत कथा सांगणाऱ्यासाठी असते, नाही तर स्विफ्टचा 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' हा जहरी टीकेचा ग्रंथ आज बालकथा म्हणून वर्गीकृत झालाच नसता ! 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' हा त्या काळातला बंदी घालण्याच्या लायकीचा काल्पनिक प्रवासवर्णनाचा व साहसाचा ग्रथ मानला गेला होता, हे आपल्यापैकी अनेकाना ठाऊकही नसेल(बऱ्याच जणानी तो पूर्णत: वाचलेलाही नसतो ! ) अर्थात बालकथा ह्या बालके लिहीतही नाहीत, तसेच निव्वळ कल्पनारम्य विश्वही त्यात नसते.

जी. एं. च्या अमृतफळात बालक, किशोर व तरुण–वृद्ध स्त्रीपुरुष सर्व आहेत. दुष्ट माणसे आहेत. पण 'विजय सुष्टाचा होतो. वातावरणात राजकुमार वगैरे मडळी असल्याने मार्क्सप्रणीत दोन वर्ग स्पष्ट दिसतात, प्रधान, वजीर याच्या 'बूर्झ्वा' रूपाने मध्यमवर्गही भेटतोच गुहा, नद्या, जादू बोलणारे प्राणी, अदृश्य होणे, चेटूक असले 'फॅन्सी' व फॅन्टसी तल्या प्रकाराची इथे रेलचेल आढळते.

एकूण कथा अकरा आहेत. 'हसणारा मासा' 'पखपरी' (वास्तविक परीला पंख असतातच ! तरी जी. एनी तिला पंखपरी का म्हटलंय ? की हाच तो जी. ए टच् ?) 'सर्पकुमार' 'शिकारी', 'विणकर' अशी मडळी इथे भेटतात. कथाच्या वातावरणाचा विचार करता त्यात दमास्कसप्रणीत अरबी प्रभाव जाणवतो, पण एखाद्या कथेत ख्रिश्चन वातावरणही आहे या सग्रहातील सर्व अनुवादित कथापैकी एक विशेषनाम वगळता (लेखमन) बाकी सर्वत्र राजपुत्र, विणकर, चेटकी असे नाम–सर्वनामनिदर्शक उल्लेख आहेत.

बहुतेक सर्व कथाच्या शेवटी 'इटुकली मिटुकली गोष्ट सरो, तुमचे आमचे पोट भरो' किंवा 'साठा उत्तराची कहाणी सफल सपूर्ण' धर्तीचा शेवट आहे आभाळातून तीन फळे पडली, एक फळ गोष्ट सागणाऱ्याला' व इतर दोन अशीच वाटलेली आढळतात. पुस्तक सपल्यावर जी. ए. च्या खास वाचकाना सर्वच्या सर्व फळे जी. ए. पुस्तकप्रकाशक आणि विक्रेते यानाच मिळाली तरी त्यांची खत वाटत राहणार !

बालकासाठी पुस्तक (अनुवाद) म्हटल्यावर तो फारसा सरळ भाषेतही नाही. याच्या पहिल्याच पानावर 'दुर्मिळ' 'आश्चर्य' व 'शस्त्रास्त्रे' हे शब्द भेटतात. तसेच मी 'चोराच्या चिध्या करीन' असा बोजड शब्दप्रयोगही येऊन जातो मुलाना कोकीळ माहिती असतात, पण जी. एनी 'रानकोकिळ' वापरला आहे. सवादाचे भाषातरदेखील बोजड वाटते. उदाहरणार्थ 'परमेश्वराची कृपा आहे, ती तुम्हालाही लाभो, वझीर' एका गोष्टीचा (मास हसता त्याची) शेवट ओ. हेन्री शैलीचा आहे. राणीच्या सर्व दासीचे कपडे उतरविल्यानंतर त्या तगडे मर्द असलेल्या आढळतात. (म्हणून मासा हसला होता ! ) मूळ इग्रजीमध्ये आदरार्थी बहुवचन नसल्याने मुलगा बापाला बापच म्हणणार–एकेरी, पण जी. एं च्या अनुवादातही शिकाऱ्याचा मुलगा 'मला बाबाचो बदूक दे' असे का म्हणतो ? ग्रामीण मराठीत बापाला 'बा' म्हणतात, तसला हा प्रकार असावा ! 'मी तुला त्याबद्दल शंभर नाणी देईन ! त्याबद्दल की त्या बदली ?' 'पाण्याचे अभावी भाकरीचे पीठ डोळ्यातील पाण्यानेम ळू का ?' 'सूर्यप्रकाशासारखा सुदर' वगैरे सुदर शब्दप्रयोग व रचना आहेत (पण त्या मुळातीलच असणार ! ) जी. ए.नी वापरलेला 'पागेदार' (किल्लेदारप्रमाणे) हा शब्द मी तरी प्रथमच

वाचला (कदाचित माझे वाचन मर्यादित असेल !) 'भूत-बाई 'ला हडळ, कँदाशीण हे शब्द मराठीत नाहीत का ? 'देव त्याला पाठीराखा लाभो' हे कोणत्या मराठीतले वाक्य ? असला अनुवाद पु लं.च्या 'एका कोळियाने 'ची आठवण करून देणारा वाटतो. 'कोल्हयाने त्याला पायाने जाण्यास (पायी चालत किंवा चालत–चालले नमते ?) सागितले होते !' व 'स्वत चा खरा कम दाखव.' म्हणजे काय ? जांभई देत राजपुत्र म्हणतो 'मी थोडा ब्रेड आणला असता !' जर इग्रजीत मराठी तित्तिरला शब्द आहे, तर मराठीत साध्या ब्रेडला प्रतिशब्द नसावा ना ? नतर सोनेरी केसाच्या राजपुत्राला 'पख-प्राणी' भेटतो एंजलला पख असतातच, गंधर्व, यक्ष, किन्नर हे अद्‌भुत प्राणी उडतच असतात ! मग 'पख-प्राणी' हे काय प्रकरण आहे ? तसेच एका गारद्याला राजा 'गर्दन-छाट' (मानकाप्या या अर्थाने) हाका मारतो जी. एं.चे नवीन शब्दाचे वेड वेडच वाटावे इथवर गेलेले आहे.

हा संवाद पहा–

मुलगा नमस्कार रत्नपक्षी ! (रत्नपक्ष्या नको का ?)

रत्नपक्षी धर्मोपदेशकाच्या मुला, नमस्कार !

मुलाच्या नमस्काराला उत्तर आशीर्वाद यायला हवे. बोलणारे समजातीचे तर नाहीतच, शिवाय समवस्कयही नाहीत ! 'नमस्कार चिमणाताई !' यामध्ये चिमणा हा नर-विशेष आहे, मग चिऊताई किंवा चिमणी ताई हवे. 'चिमणाताई' हे खूपच झाले ! स्वर्गाला जी. ए 'देवबाप्पाचा मुलुख' असे निष्कारण बोजड भापातर पुरवितात. म्हणजे सर्वच्या सर्व अकरा कथाचे अनुवाद (मलाही) वाचनीय वाटले तरी ' ते मुलासाठी विशेष कष्ट न घेता छापले गेले आहेत. मुले ही परमेश्वराप्रमाणे क्षमाशील व फक्त आशय जाणून घेणारी असल्याने त्याना कदाचित काही खटकणारही नाही. कारण गोष्टीचा वेग व झपाटा याकर्षक आहे, पण वन्याऐकी अनुवाद करण्यासाठी प्रतिभाशाली जी. एं नी विशेष काय केले ?

मूळ कथालेखनात तीन, सात हे आकडे वारवार येतात तीन राजपुत्र, राजकन्या म्हणजे उलटा त्रिकोण, 'अमृतफळापेक्षाही' जुना प्रकार दिसतो ! विणकर, चांभार व दरबारी याच्यात समतेचे नाते असल्याचे संवाद येतात जाताजाता तेही आले. 'ॲपल ऑफ इम्मॉर्टॅलिटी' हा कथासंग्रह 'अरेबियन नाईट्स्–वजा (मायनस) शृगार' असा वाटावा एवढा चित्ताकर्षक आहे; पण जी. ए नी ॲपलचे अमृतफळे करून चढविलेला मराठी अगरखा तद्दन ढगळ स्वरूपाचा आहे असंच म्हणावं लागेल.

¤

जी एं, च्याच नव्हे एकूणच पाश्चात्य बालकथातले राजे मोठे रागीट दाखविलेले असतात म्हणजे लोकशाहीचे गोडवे गाणाऱ्या देशात सतत एकाधिकारशाही वा हेकेखोर आणीबाणी चालूच राहते का ? त्या राजाला रागवायला वा लोभावायला फारसा काळ लागत नाही. त्यातच सुदर राजकन्या वगैरेचे काल्पनिक जग बाळपणी मनावर वारवार का ठसविले जाते कळत नाही ! हा हिंदी चित्रपटाप्रमाणे गरीबाच्या मुलासाठी 'एस्केपिस्ट' करमणुकीचा प्रसार नाही का ? भारतात गेली ३२–३३ वर्षे राजे–राण्या अधिकृतपणे नष्ट झाल्यावरही जावे तिथे ते भेटत राहतात.

हा परपराचा भाग मानला तर साप्रतची ध्येये-विचारसरणी याची सागड घालणारे राजे-राण्या कथातून भेटायला हव्रेत की नको ? एकच विवाह आणि तोही उशिरा हे साप्रतचे ध्येय असता, गोष्टीतले राजपुत्र तो पाहताच बाला, कलिजा खलास झाला, असे होतात ! शिवाय बऱ्याच राजाना एकाहून अधिक राण्या असतात ही गोष्ट वेगळीच !

¤

डॉ. मॅक्लीलॅंड या अमेरिकन मानसशास्त्रज्ञाने 'एन् अँचीव्हमेंट' (n Achievement) (नीड फॉर अँचीव्हमेंट) ही सकल्पना माडून व्यक्तीची आर्थिक प्रगती किंवा उन्नतीची जिद्द त्याच्यावर बालवयापासून होणाऱ्या सस्कारांशी व पर्यावरणाशी निगडित असल्याचा सिद्धात माडला होता त्या दृष्टीने डॉ मॅक्लीलॅंडनी पूर्व व पश्चिमच्या दशाचा प्रत्यक्ष अभ्यास करण शक्य नसल्याने देशोदेशीच्या बालकथा अभ्यासून आपल्या 'एन् अचिव्हमेंट' प्रमेयास बळकटी आणली होती. त्या दृष्टीने 'अमृत फळा' चा अभ्यास करताना धडपड, कष्ट, औदार्य, विज्ञान, समता, आदी गोष्टीचे उल्लेख लक्षात घेण्यासारखे आहेत. 'अडचणीतून मार्ग काढणारा तो राजपुत्र म्हणजे मीच' हे वाटणे, पटणे व तशा विचाराचे बीज मनोभूमीत पडणे यातून 'एन् अँचिव्हमेंट' चे कोभ तरारत असतील का ? 'एन् अँचिव्हमेंट' च्या सदर्भात भारतीय बालकथा साहित्याचा अभ्यास होण्याची गरज आहे. 'अमृतफळे' मध्ये भेटणारी माणसे झुजार, हुषार तर आहेतच पण ती हरली तरी पराभूत होत नाहीत !

एका अर्थाने जी एं. नी सुमार (त्याच्या नेहमीच्या तुलनेत) ग्रथरचना केल्याने मला एवढं लिहिता आलं जी. एं. नी अस्सल भारतीय बालकथाना अवश्य जिव्हाळ्याचा विषय करावा. फ्लॅश गॉर्डन कॉमिक्स् वाचून जमा वैज्ञानिकाला 'इटरफेरॉन' या कॅन्सरविरोधी ड्रगचा शोध सुचला, न जाणो, जी एं.च्या ओरिजिनल बालकथा वाचून मराठी प्रदेशात 'एन् अँचीव्हमेंट ची जाणीव जागती येईलही ! ¤

अमृतफळे
जी ए. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
पृष्ठे : १५९
मूल्य : रु १५


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

फिनिक्स निवड

# The Fall of The Shah

By Fereydoun Hoveyda

इराण इतक्या दिवसापासून प्रकाशझोतात आहे की त्या देशावद्दल अधिकाधिक वाचन करण्याची उत्सुकता वाढतच आहे. खोमेनीचे व्यक्तिमत्त्व, शहाची गडगंज संपत्ती, इराणने ओलीस धरलेले अमेरिकन्स, शहाचा दयनीय अंत आणि आता इराक–इराण–युद्ध अशा या ना त्या कारणाने इराण सारखा न्यूजमध्ये असतो.

आपण पुस्तकाच्या दुकानी गेलो असता इराणवर अलीकडे छापलेली ३–४ भारदस्त पुस्तके दृष्टीस पडतात. त्यातील इराणच्या दिवगत शहाचे आत्मचरित्राने माझे लक्ष ओढून घेतले इराणच्या शहाचा शोचनीय अत वाचून या गृहस्थाच्या जीवनाबद्दल अधिक वाचायची ओढ वाचकाच्या मनात निर्माण झाली असेल. वरील पुस्तकसुद्धा शहाच्या दृष्टिकोनाची दुसरी बाजू म्हणून वाचनीय ठरेल

असे वाचले होते की खोमेनीनी एकदा सगीतावर बंदी टाकली होती. त्यानी इतर अनेक मध्ययुगीन कायदे परत अंमलात आणले व सपूर्ण एक कालखंडच मागे ढकलण्याचा प्रयत्न केला अशा लोकाची चलती होते कशी हे एक कोडेच आहे. यथा राजा तथा प्रजा की यथा प्रजा तथा राजा ?

*या लेखकाचे भाऊ अमीर अब्बास हॉवेदा* हे इराणचे काही वर्षे पतप्रधान होते खोमेनीनी या पतप्रधानाला ठार केले हे सर्वांना माहीत आहेच

एकदा या पुस्तकाचे लेखक फरेदुन हॉवेदा हे शहाना भेटावयास गेले असताना त्याना असे आढळून आले, की शहा वास्तवतेला सामोरे न जाता सारखे रॅशनलाईजच करत होते. लोकात कमालीचा असतोष होता. चलनफुगवटा, रहदारीचे अडथळे, अवास्तव भाडे, सेन्सॉरशिप, हुकूमशाही, खाद्यपदार्थांची टंचाई वगैरे अनेक प्रश्नांनी इराणला ग्रासले होते. देशाची नैसर्गिक सपत्ती व लोकाची गरिबी ही नेहमी व्यस्त प्रमाणात असते ! हा एक प्रकारचा पार्किन्सन लॉच म्हणावा लागेल ! हॉवेदा असे म्हणतात की, शहाला फ्रँकोची व जुआन कार्लोसची या दोन्ही भूमिका एकदम वठवायच्या होत्या शहा आपल्या मनाची कवाडे कधीच उघडी ठेवीत नसे, असे हॉवेदा म्हणतात. इतकेच नव्हे तर मुलाखतीत खलिल जिब्रानच्या 'Is there any place where there is no traffic in empty talk ? Is there on this earth one who does not worship himself talking ?' या ब्रीदवाक्याच्या *अनुषंगाने शहा स्वत च बोलत राही हॉवे*दाना मध्येच एखादा प्रश्न विचारण्याची सधी जेमतेम मिळत असे परवाच एस्. एम्. जोशी असे म्हणाले होते की माणसाने एक पौड सॉलिड काम केले तर टनावारी वडबड करण्यापेक्षा त्याचे मूल्य अधिक आपल्या प्रत्येक राजकीय कार्यकर्त्याच्या ऑफिसमध्ये जिब्रानचे वरील वाक्य कसलेही डेकोरेशन न करता टागले पाहिजे !

लोक उघड उघड शहाच्या विरुद्ध बोलत नसत; पण शहाची जुळी बहीण राजकुमारी आश्रफ हिच्याविरुद्ध लोक फार बोलत असत. तिची आणि तिच्या साथीदाराची इराण देशाच्या धद्यावर मक्तेदारी होती अशी लोकाची ठाम समजूत होती विधुर, ब्रह्मचारी वगैरे लोकाना जशी विनापाश वाई पाहिजे असते तशीच देशाला विनापाश पतप्रधानाची किंवा नेत्याची गरज असते !

शहाविरुद्ध लाट एवढी जोरात होती की जगातल्या काही मोठ्या शहरातसुद्धा भिंतीवर 'Death to the Shah' ही अक्षरे *दिसायला लागली होती.* (आपल्या पुण्यात सुद्धा हे वाक्य दिसले होते ) विशेषत विद्यार्थी व विचारवत यानी शहाविरुद्ध जोरात तोफ डागली होती. अमेरिकेने शहरावर दबाव आणला व निदान थोडेसे तरी लोकशाहीकरण (democratisation) करा अशी सूचना केली. शहाने त्याप्रमाणे वरवर लोकाना स्वातत्र्य दिलेही, परंतु हाडाने शहा हुकुमशहा होता. आपला देश जसा अस्थिरतेकडून अस्थिरतेकडे गेला तसा शहाचा इराण एका हुकुमशाहीकडून दुसऱ्या हुकुमशाहीकडे गेला. कारण शहा आणि खोमेनी यांच्यामध्ये जितके ध्रुवीकरण होते तितकेच साम्यही होते. दोघेही हुकुमशाहीकडे झुकलेले, दोघेही डूख धरणारे, दोघे हट्टी, स्वत च्या देशाकडे व जगाकडे बघण्याचा दोघाचाही दृष्टिकोन अतिसाधा (Simplistic). टीका, विरोध ह्याचे दोघानाही वावडे. दोघानाही असे वाटत होते की त्याना देवाकडून प्रेरणा मिळत आहे.

आणि तरीही एक साधुसारखा रहातो तर दुसरा चैनीत व दिमाखात रहात असे. खोमेनीचा जे विरोध करतात त्याना तो Criminals and thieves म्हणतो. शहाना ज्यानी विरोध केला त्याना शहा a few *weeds म्हणून संबोधीत असे.* शहाचे गुप्त पोलीस Savak म्हणून होते, तर खोमेनीचे Komiteh म्हणून आहेत या दोहोंनी इच्छेप्रमाणे लोकाना अटक केले व ट्रायलशिवाय शिक्षा दिल्या सत्य असे आहे की शहा व खोमेनी या एकाच हुकुमशाही नाण्याच्या दोन बाजू आहेत भविष्यात उडी मारून एकाला गतिमान आधुनिकीकरण करून इराणला अरब देशाचा नेता करायचा होते, तर दुसऱ्याने सनातनी धर्माचा अनुनय करून इराणला ६००–७०० वर्षे मागे लोटले

सुरुवातीला शहा–खोमेनी सघर्ष होता त्यावेळची गोष्ट. इराण डायनेमाइटवर बसला होता शहाच्या विरुद्ध मजकूर असलेल्या खोमेनीच्या टेप्स 'ओरिएन्टल म्युझिक' म्हणून तेहरानमध्ये मिळत असत शिवाय ७१ मध्ये Le–Monde नी शहाची मुलाखत घेतली त्या वेळी शहा म्हणाले होते, 'इराणी लोकाना शहा अजिबात आवडत नाही, खोमेनीची पाळेमुळेही इराणमध्ये नाहीत. कारण त्याचा जन्मच हिंदुस्थानात झाला. *आता ज्या देशाने त्याला दत्तक घेतले आहे* तिथेच तो देशद्रोही झाला आहे तो ब्रिटिशाच्या पॅरोलवर आहे तसाच तो इराकच्याही पॅरोलवर आहे ' अर्थात् खोमेनीही शहाविरुद्ध इतक्याच अतिरेकाने बोलत असे.

परिस्थिती अशी तंग असताना शहाच्या एका मन्त्र्याने खोमेनीविरुद्ध एक भडक लेख छापायला भाग पाडले या लेखात खोमेनी समलिंगसभोगवादी होता व त्याची आई एक सवग नर्तिका होती, असे लिहिले होते. झालं. याने ठिणगी पडली डायनेमाइट-

वर व दुसऱ्याच दिवशी कॉममध्ये फातिमाचे थडगे आहे तिथे गोळीबार करावा लागला व इराण पेटले

या इथे कॉमच्या एको पॉइंटपासून 'Death to the Shah' व 'Down with the Shah' या दोन वाक्याचे प्रतिध्वनी जगभर भितीवर घुमू लागले आणि हळूहळू शहा मनाने खचत गेला तो परत कधी त्याच्या मनाने उभारी धरलीच नाही. एका देशातून दुसऱ्या देशात शटल कॉकमारखा (पिच्छकंदूक) फेकला गेला व व शेवटी अन्वर सादतने त्याला जवळ केले. ऑगस्ट ११, १९७८ तर काही लोकानी 'Shah Bastard' म्हणून घोषवाक्ये देऊन, पोलिसाच्या गाड्या, बँका व चित्रपटगृहे जाळली या अशा तापलेल्या वातावरणात शहाने संचारबंदी लागू केली; पण लोकानी ती धुडकावून लावली. अशी परिस्थिती असतानाच १९ ऑगस्ट रोजी आबादानमध्ये रेक्स चित्रपटगृहास प्रचड आग लागून ३७७ लोक मृत्युमुखी पडले. सुरुवातीस हे काम अतिरेक्याचे आहे अशा बातम्या आल्या, पण मग अचानकपणे नियतकालिके शात झाली. सरकारसुद्धा ब्र काढेना. दोन आठवड्यानतर अशी एक बातमी आली की सरहद्दीवर या गुन्ह्यासाठी इराकी सरकारने या माणसास धरले आहे हा माणूस इराणच्या ताब्यात दिला गेला, पण परत या प्रकरणावर पडदा पडला तो आजतागायत कायम आहे !

मी गेल्या महिन्यात शहाचे आत्मचरित्र घेतले. त्याच्याशी तुलना करता हे पुस्तक अधिक वाचनीय वाटले.

—जे. एन्. पोडा

रंगभूमी

# प्रेक्षकांना बांधून ठेवणारे 'पुत्रकामेष्टी'

जे आपल्याजवळ नाही त्याच्याच पाठीमागे मनुष्य का लागतो ? माणूस वशविस्तार तरी का करतो ? सगळी सुख ज्याच्यासमोर हात जोडून उभी आहेत ते अपत्यप्राप्तीसाठी का वेडे होतात ? अशा काही प्रश्नामधून आणि स्त्रीची मातृत्वभावना यामधून उभं राहिलेलं नाटक म्हणजे "पुत्रकामेष्टी."

हे 'एक कौटुंबिक जिव्हाळ्याचं' नाटक एका अगदी वेगळ्या विषयाचा विचार करतं. केवळ आई, बाबा, भाऊ वगैरे आणि त्याच्या काही समस्या म्हणजेच कौटुंबिक नाटक नव्हे, तर एका धनाढ्य जोडप्याच अपत्यहीनतेचं दुःख हेही कौटुंबिक जिव्हाळ्याचं असत. किंबहुना अपत्यहीनता हा विषय जितका कौटुंबिक आहे तितकाच तो सामाजिकही आहे मूल नसलेल्या स्त्री–पुरुषाची समाजात हेटाळणीच होत असते; का? त्यांच्यावर निसर्गाने क्रूर अन्याय केला आहे असे लोक का समजत नाहीत ? कविता करणं हाही एक निर्माणशीलतेचाच भाग आहे, असे असताना जर एखाद्याला कविता करता येत नसेल तर त्याला कोणी काहीच बोलत नाही मात्र मूल नसलेल्याना वाझ किंवा नपुसक म्हणून का हिणवले जावे ? या प्रश्नाच काहीच उत्तर सापडत नाही. म्हणून शेवटी ते निष्फळ दान नशिबाच्या पदरात टाकून मनुष्य स्वस्थ बसतो.

श्री. अनिल बर्वे याचं हे नवं नाटक निपुत्रिकता, देवदासी (थोड्या प्रमाणात), टेस्टट्यूब बेबी यासारख्या विषयाचा अन्याच यशस्वीपणे विचार करते आणि आपल्यालाही विचार करायला लावते

इंडस्ट्रीजचा मालक बी के आणि त्याची पत्नी उमा याच्या लग्नाला दहा बारा वर्षे होऊन गेली तरी त्याच्या घरात मूल नाही ! लग्नानतर हनिमूनला निघालेल्या या जोडप्याला एक साधा अपघात होतो. पण त्यामुळे उमा माता बनण्यास कायमची असमर्थ बनते. हा धनाढ्य इसम उपचारासाठी जग पालथ घालतो पण यश येत नाही. हा बी के. बुद्धिवादी असतो तरी तो मत्र-तंत्रही करून बघतो. सगळेच प्रयत्न हरल्यावर तो ते कटु सत्य पचवतो; पण त्याची पत्नी उमा मात्र मुलासाठी वेडीपिशी बनते. मूल दत्तक घेण्यास तिचा विरोध असतो आणि दुसर लग्न करण्यास बी. के. चा ! शेवटी एक स्त्री 'भाड्याने' आणावयाचं ठरतं. (कारण सुटे गर्भाशय मिळणार नाही म्हणून.) आणि बी. के. पासून तिला होणार मूल तिला प्रचड पैसे देऊन घेण्याचं ठरतं. प्लॅनप्रमाणे बरचसं घडत. पण शेवट मात्र अनपेक्षितरीत्या धक्कादायक ठरतो. हा शेवट अनपेक्षित आणि धक्कादायक असला तरी अ–वास्तव नक्कीच नाही

श्री अनिल बर्वे यानी नाटक बांधेसूद व रेखीव लिहिल आहे. क्षणभरही ते कंटाळवाणं होत नाही.

बी. के च्या भूमिकेत स्वत. प्रभाकर पणशीकर आहेत वयाच्या मानान त्यानी तब्येत उत्तमच ठेवली असल्यानं साधारण चाळिशीच्या आसपासचा धनाढ्य इसम या भूमिकेत ते उत्तम शोभून दिसले अपत्यहीनतेचं दुःख या माणसान कामाच्या व्यापात बुडवून टाकल आहे; पण आपल्या बायकोचं दुःख त्याला बघवत नाही, अपत्यहीन स्त्री कालांतराने वेडी बनते हेही त्याला ठाऊक आहे आणि त्या वेडसरपणाची झाक तो आपल्या बायकोमध्ये बघतो आहे. असहायपणे. बायकोच्या आग्रहाखातर तो एका स्त्रीशी संबंध ठेवण्याचे कबूल करतो ती स्त्री ही स्त्री नाही-माणूस नाही, हे त्यानं मनावर पक्कं ठसवलेल असत. गर्भाशय सुटे मिळत नाही म्हणून ही स्त्री–एक इनक्युबेटर एवढच तिच काम. यानं पैसे द्यायचे, तिने मूल, हा सौदा. पण तो 'भावना' विसरतो आणि नंतरचा उभा राहणारा गुता त्याला अनपेक्षित असतो

या सगळ्या गोष्टीचं भान ठेवून सर्व 'मूडस्' चे बारकावे श्री. पणशीकर यांनी अत्यत सुरेखपणे उभे केले आहेत कर्तबगार पुरुषाना वाग्माची गरज नसते म्हणणारा बी के., मित्रासमोर दुःख उघड करतो. स्वकर्तृत्वाचा अहंकार असलेला बी के. 'बाई-कडे' प्रथमच जाणारा भित्रा बी. के., बाप झाल्याच्या आनंदाने फुलून आलेला बी. के आणि शेवटी हादरलेला बी के. हे सर्व काही श्री. पणशीकरानी जिवत केले आहेत.

त्यांचा आवाज व त्याची बोलण्याची ढब सुपरिचित असल्याने त्याविषयी काही बोलावयास नको.

अपत्यासाठी आसुसलेली उमा उभी केली आहे सौ. सुधा करमरकर यानी. या अत्यंत अवघड रोलमधे त्यानी अक्षरशः जीव ओतला आहे प्रचंड घराच्या प्रत्येक भिंतीवर एक तरी लहान मुलाचा फोटो हिने लावला आहे. लहान मुलाची खेळणी जमवून ती त्यात हरवून जाते. मुले असलेल्या घरात जायला तिला फार बरे वाटते; पण त्याच वेळी त्या मुलाच्या आया आपल्याशी वाईट रीतीने वागतात, टोमणे मारतात याचे दुःख तिच्या जिव्हारी झोंबतेय. मुलासाठी दुसऱ्या स्त्री-बरोबर सबंध ठेवण्यासाठी तीच नवऱ्याला भाग पाडते आणि आपला नवरा तिच्या प्रेमात तर पडणार नाही ना, या शंकेनेही ती ग्रस्त होते. घरात 'आपले' मूल आल्यावर ती आनंदाने मोहरून जाते आणि शेवटच्या धक्क्याने ती मोडून पडते.

ही सर्व परिवर्तने सौ. करमरकर यानी अचूक पकडली आहेत. त्यांचे हसणे, रडणे, एकच गोष्ट अखंडपणे बडबडत राहणे हे सर्व खरे वाटते. कुठेही कृत्रिमता डोकावत नाही. इतकी चागली स्त्री-भूमिका अलीकडच्या काही वर्षांत प्रथमच मराठी रगभूमीवर आली असावी.

सौ. सुधा करमरकराच्या या रोलच्या तोडीस तोड भूमिकेत आहे मधुमती काबीकर. पूर्वी तमाशात (किंबहुना लोकनाट्यात) काम करणाऱ्या या मधु काबीकरची भूमिकेची समज व कसब वाखाणण्याजोगे आहे. बी. के. च्या 'मादीसशोधनात' शंभरपैकी शंभर गुण मिळवून पास झालेली छदा नावाची एक वेश्या. पैशाची प्रचंड लोभी. दोन लाख रुपयासाठी ती एका मुलाला जन्म द्यायला तयार होते; पण ही नुस्ती अशी नाही. प्रत्यक्ष आई-बापानीच तिला 'देवदासी' बनवून या वाईट धद्याला लावले आहे, अगदी दहाव्या-बाराव्या वर्षीच. आता तिच्या आयुष्यात गिऱ्हाईक आणि पैसा याशिवाय काहीच उरत नाही. पैशासाठी या 'कामात' तयार झालेली ही छदा, मातृत्व प्राप्त होताच वात्सल्याची खाण बनते. हा बदल आश्चर्यकारक असला तरी कृत्रिम, अवास्तव नाही. कारण "आई' बनण्याची ही नैसर्गिक इच्छा व भावनाच प्रचंड ताकदीची आहे आणि हा सगळा बदल आणि एकदरीत छंदाचं व्यक्तिमत्त्व मधु काबीकरने जबरदस्त ताकदीने उभे केलेय. आई-बापाना शिव्या घालणारी, देवाची बायको म्हणून एक दिवस 'देवासाठी' धंदा बंद ठेवणारी छंदा देवाला शिव्याशापही देते आणि शभर रुपयाचा 'निवेद' ही दाखविते. अनेक पुरुष बघणारी ही छंदा 'शेठ' ह्याच फक्त 'माणूस' म्हणते. आपल्या पोटच्या गोळ्याला अंगावर पाजता येत नाही म्हणून तड फडणारी छंदा शेवटी मातृत्वाच्या निसर्गदत्त हक्कासाठी वाघिणीसारखी चवताळून भाडते. कोर्टात जिंकलेली छदा शेवटी पैसे आणि मूल दोन्हीही बी. के. लाच देऊन जाते!

छदाच्या स्वभावातले सगळे विरोधाभास, कंगोरे आणि बदल हे सर्व प्रेक्षकांपर्यंत पूर्णपणे पोचवण्यात काबीकर यशस्वी होते. यात लेखनाइतकाच किंबहुना त्यापेक्षा जास्त भाग तिच्या अभिनयकौशल्याचा आहे.

तसेच शेवटी ती मूल व पैसे दोन्हीही परत देऊन जाते, हा त्याग खोटा नाही. कारण तत्पूर्वी माळिणीच्या तोडून तिच्या मुलाच्या अंधाऱ्या व वास्तव भवितव्याचे भीषण चित्र तिच्यासमोर पूर्णपणे उभे रहाते. या मुलासह नीट जगायचे कसे, हा यक्षप्रश्न समोर असल्याने मुलाचे वाटोळे होऊ नये म्हणून छंदाने घेतलेला हा निर्णय नीट विचार करून घेतल्याचे पटते.

आणखी एक महत्त्वाचे पात्र म्हणजे राजा. उमाच्या माहेरी उमाच्या सख्ख्या भावासारखा राहणारा हा मुलगा उमाचे आई-बाप आपले जन्मदाते नसून अन्नदाते आहेत हे कळल्यावर उमाचा 'मानलेला भाऊ' बनतो. (हे सर्व उमाच्या सवादातून छान सूचित केले आहे.) आणि या उदाहरणामुळेच दत्तक मूल घ्यायला उमा धजावत नसते. हा राजा आता वकील आहे, बी. के. चाही चागला मित्र किंवा कुटुबातलाच एक घटक आहे. तो या नाटकात बराचसा 'को-ऑर्डिनेटर' सारखा वावरतो. ही भूमिका श्री. अशोक समेळ यानी चोखपणे पार पाडली.

यातली इतर पात्रे म्हणजे मुका नोकर, माळीणबाई आणि बुद्धी, हे सगळेच लक्षात राहतात, पण विशेषत. छदाच्या कोठीवरची बुद्धी हे पात्र कहर करते. ते बघायलाच हवे.

नाटकातील संवाद अत्यत 'बोलके' आहेत. कुठेही फालतू बडबड नाही. प्रवेशाची व अंकाची मांडणी सतत उत्कठा वाढवीत राहतात. काळ हा सवादातून व्यक्त होतो. श्री. अनिल बर्वे हे तरुण व ताज्या दमाचे (नव्या विचाराचेही) लेखक आहेत. त्यामुळेच हा वेगळा विषय त्यानी निवडलेला आहे देवदासी या दुष्ट प्रथेची एक बाजूही त्यानी फार भडक न करता माडली आहे आणि हे सगळे करताना मनाचे नाजूक कप्पे आणि भावना याच्याकडे डोळेझाक मुळीच केलेली नाही, हे विशेष.

हे अवघड नाटक दिग्दर्शक श्री काती मडिया यानी अत्यत उत्तम रीतीने बसवले आहे. नाटक हे दृक्-श्राव्य आहे याचे भान त्यानी सोडलेले नाही. त्यामुळे 'ॲक्शन'-लाही (म्हणजे मारामारी नव्हे) त्यानी भरपूर वाव दिला आहे आणि नटानी त्याची जबाबदारी व्यवस्थितरीत्या उचलल्यामुळे संपूर्ण नाट्यकृती देखणी बनली आहे.

छेल-परेश यानी नाटकाला सुसंगत नेपथ्य वापरले आहे. बी के. ची श्रीमंती आणि उमाची अपत्याची आस प्रेक्षकापर्यंत व्यवस्थित पोहोचते. (यामधे, उमाने लहान पोरा प्रमाणे काढलेली बालचित्रेही येतात.) पण त्यानी दिवाणखान्यात एक सुरेखसा लाकडी हत्ती जमिनीवर का बरं ठेवला? इतकी चागली वस्तू कुणी पायऱ्याच्या पाठीमागे ठेवील असे वाटत नाही. फिरत्या रगमंचाचा वापर रसपोषक वगैरे आहे; पण दिवे आल्यावरसुद्धा रगमच फिरत राहणं, प्रेक्षकासमोर 'भिंती साधून' घेणे हे जरा खटकते.

प्रकाश आणि सगीत हे हवे तेव्हाच व परिणाम वाढवण्यासाठीच वापरले आहे. नाटकाच्या अगदी सुरुवातीचे एक पुरुषाच्या आवाजातले गाणे किंवा काही तरी (मला ते श्लोक वाटले) अजिबात नीट ऐकू आले नाहीत ध्वनिसयोजनातील ही चूक सुधारली जाईलच. सबध नाटकात दोनदा स्त्री-स्वरात गाणी येतात तीही उत्तम चालीत बाधलेली व गायलेली आहेत. (गायिका—सीमा, शब्दस्वराकन—चंद्रचूड वासुदेव) पण रेकॉर्डिंग खराब वाटले.

अर्थात या एक-दोन चुका अत्यंत किरकोळ आहेत, त्याने नाटकाच्या टोटल इफेक्टवर फारसा परिणाम होत नाही.

—निखिल गजेंद्रगडकर

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# एक बार फिर चार बार फिर

तुम्ही एक हिंदी चित्रपट पाहत आहात. पडद्यावरची घटना घडते आहे लंडनमध्ये. हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध स्टार महेंद्रकुमार आणि त्याची पत्नी कल्पना त्याच्या फॅन्सच्या आग्रहाच्या निमंत्रणावरून खास लंडनला आले आहेत, अशी चित्रपटाची सुरुवात होते.

महेंद्रकुमार अनेक बायकांबरोबर लफडी करणारा, पैशाचा माज असलेला, आढ्यतेखोर आणि असे बरेच दुर्गुण पदरी बाळगून असणारा (साहजिकच बायकोकडे दुर्लक्ष करणारा) नवरा. त्यामुळे त्याच्यापासून दुरावलेली कल्पना आणि लंडनमध्ये तिच्या आयुष्यात पाऊल टाकणारा एक चित्रकार विमल याची प्रेमकथा चित्रपटात सुरू होते आणि मग एका बाजूला आपला अधिकृत, कायदेशीर नवरा, सामाजिक बंधने, लहानपणापासूनच्या संस्कारामधून मनात तयार झालेली नीतिमूल्ये, त्याच मूल्यांच्या पायावर व्यक्तीच्या वागणुकीचे मोजमाप करणारा मित्र व नातेवाइकांचा गोतावळा आणि लौकिक यश व समृद्धी; तर दुसऱ्या बाजूला एक भावुक, हळवा प्रियकर, तनामनाची पखरण घालून एका काव्यमय आनंदनगरीत नेणारे त्याचे प्रेम, 'माझा नवरा जर इतर बायकांबरोबर वाटेल ते करायला मोकळा असेल; तर मीच त्याच्याशी एकनिष्ठ राहण्याचे कारण काय?' ही बंडखोरी आणि स्वतःच्या आनंदासाठी स्वतःची मोज-मापे वापरून लौकिक परिमाणे नाकारण्याची मनस्वी वृत्ती या रस्सीखेचीत कल्पना हेलकावे खाऊ लागते. खूप विचार करून ती अखेर विमलला विसरून जाण्याचा निश्चय करते; पण शेवटच्या क्षणी महेंद्रला ती त्याच्यापासून घटस्फोट घेणार असल्याचे फोनवर सांगते. लंडनच्या एका धूसर रात्री निर्मनुष्य रस्त्याच्या कडेला पायऱ्यांवर बसलेले विमल आणि कल्पना उद्याच्या उषःकालाकडे डोळे लावून बसलेले असताना चित्रपट संपतो.

केवळ भारतीय पतिव्रतेच्या पारंपारिक कल्पनेला धक्का देणारा चित्रपट म्हणून या चित्रपटाचे कौतुक नाही. कारण विवाहोत्तर प्रेम आणि नवऱ्याला नाकारून प्रियकराकडे जाण्याचा धीटपणा हा चित्रपटाच्या कथेचा प्रमुख धागा कुठेच झालेला नाही, होऊ शकत नाही. लग्न, त्यामुळे स्त्री–पुरुषामध्ये निर्माण झालेले आणि सामाजिक मान्यता मिळालेले नवरा-बायकोचे नाते आणि मग (हिंदी चित्रपटामध्ये दिसणारी) त्याची ठरीव व्याख्या, ठरीव परिणाम अशा कृत्रिम गोष्टीपेक्षा अधिक पलीकडचा, माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्या व्यक्तिमत्त्वाच्या गरजांचा–भावनिक, लौकिक आवश्यकतांचा शोध घेण्याचा प्रयत्न 'एक बार फिर' मध्ये आहे. मुख्यत हा प्रयत्न घोटाळत राहतो तो कल्पनाभोवती, कारण संपूर्ण सर्वाधिक पैलू लाभलेली व्यक्तिरेखा कल्पनाचीच आहे. आपल्या बेपर्वा नवऱ्याबद्दल कल्पनाला वाटणाऱ्या तिरस्काराचे रोपटे विमलच्या मनस्वी प्रेमाचे खत-पाणी मिळाल्याने उभारीने वाढत जाऊन अखेर कल्पनाने महेंद्रपासून वेगळे होऊन विमलकडे जाण्याचा घेतलेला निर्णय हा आक्रस्ताळा वा भावनाविवश तडफडाट नाही. एका स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या, बऱ्याच परिपक्व अशा स्त्रीने खूप विचार करून घेतलेल्या निर्णयापर्यंतची तिची वाटचाल 'एक बार फिर' म्हणूनच 'एक बार फिर' ही चॉकलेटी चेहऱ्याभोवती घुटमळणारी अन् घोटाळणारी प्रणयकथा उरत नाही, तर मनाच्या जमलेल्या मेळातून जन्माला आलेली गीतमय प्रीतिकथा बनते. विमल आणि कल्पना यांचे शारीरिक संबंधही केवळ एक नर आणि एक मादी यांच्यातील फक्त एकप्रक्रिया इतक्याच पाशवी पातळीवर राहात नाहीत, तर दोघामधील तोपर्यंत अव्यक्त असलेल्या प्रेमाची, एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वामुळे आकर्षिल्या गेलेल्या दोन माणसांच्या मीलनाची अपरिहार्य परिणती या स्वरूपात ते व्यक्त होतात, यातही कल्पनाच्या मानाने विमलची व्यक्तिरेखा मात्र काहीशी अधू वाटते. कल्पनाने विमलचे प्रेम, भावना समजावून घेऊन त्याच्यावर प्रेम केले, शेवटी त्याला आयुष्याचा जोडीदार म्हणून स्वीकारण्याचा निर्णय घेतला. याउलट कल्पनाच्या पतीची तिच्याशी असलेली वागणूक आणि तिला त्याच्याबद्दल वाटणारा कडवटपणा याचा उल्लेख कल्पनाने विमलपाशी कधीच केलेला नव्हता. विमलला पाठविलेल्या पत्रात तर तिने 'माझे आयुष्य तुझ्यापेक्षा वेगळे असल्याने आपण एकमेकाना विसरून जायला हवे' असाच सल्ला त्याला दिला होता. तरीही विमलने तिला पुन्हा भेटण्याची आशाळभूत विनंती करणे यातून विमलला कल्पनाबद्दल वाटणारे प्रेम हे प्रथमतः शारीरिक आकर्षण होते असे मानायचे का? कदाचित कल्पना-महेन्द्रच्या संबधाचा उल्लेख न करता फक्त विमलच्या दृष्टिकोनातून संपूर्ण कथेचा फेरविचार केला तर त्याचे वागणे (आणि थोड्या प्रमाणात कल्पनाचेही वागणे) love at first sight असे उथळ आणि तकलादू आकर्षणाचे वाटते.

याउलट कल्पना आणि महेन्द्र याच्यातील तणाव मात्र अतिशय उठावदार बनला आहे. दोघाचेही ठरवून झालेले लग्न. त्या वेळी कल्पना कॉलेजात जाणारी किशोरी. कदाचित प्रेमाबद्दलच्या त्या वेळच्या तिच्या कल्पनाही 'हिंदी चित्रपटात दिसणारा रोमान्स म्हणजेच प्रेम' इतक्याच मर्यादेतील. साहजिकच नाटके गाजविणारा, चित्रपटातून संधी मिळालेला देखणा नवरा, श्रीमती इत्यादी गोष्टी म्हणजेच सुखी संसार. याच विचारामुळे मैत्रिणीच्या चेष्टेने कल्पना भुरळायची, आत कुठे तरी सुखावायची प्रत्यक्ष लग्न झाल्यानंतर, संसारात पाऊल टाकल्यानंतर, वाढत्या वयाबरोबर जशी समज वाढू लागली, तशी तिला आपल्याला यापलीकडे आणखी काही तरी हवे आहे, याची जाणीव होऊ लागली, त्यामुळेच श्रीमंती, नाव याच्या झगमगाटात रमलेला, आपल्याकडे नावापुरतेच लक्ष देणारा किंबहुना आपलाही स्वतःच्या प्रतिमेसाठी वापर करून घेणारा नवरा तिला खुपू लागला. मग कदाचित इतर वेळी घडयातील कल्पनेच्या या सबबीवर ज्या गोष्टीकडे तिने दुर्लक्ष केले असते अशा महेन्द्रच्या गोष्टी–त्याचे शूटिंगसाठी वेळेवर न जाणे, दारात लाचार होऊन आलेल्या निर्मात्याला पैशा-

साठी अडचणीत पकडणे– इत्यादी गोष्टी लांछनास्पद वाटू लागल्या. नाव आणि पैसा यांमागे ऊर फुटेपर्यंत बेभान होऊन धावणारा आणि तसे करताना इतर कोणाचीही पर्वा न करणारा महेन्द्र तिला तिरस्करणीय वाटू लागला. कल्पनाच्या जागी दुसरी एखादी सामान्य बाई असती, तर नवऱ्याच्या या गोष्टींकडे दुर्लक्ष करून ती गप्प राहिली असती. त्याच्या पैशावर मुकाट मजा मारीत जगली असती. पण ' आणखी काही तरी 'च्या शोधात असलेल्या कल्पनाला ते शक्य झाले नाही. अखेर हे ' आणखी काही तरी ' जेव्हा तिला विमलमध्ये सापडले तेव्हा सर्व लौकिक बंधने तोडून ती विमलकडे ओढली गेली.

महेन्द्र हा तर आलेल्या प्रत्येक संधीचा (मग ती संधी म्हणजे शूटिंगसाठी अडलेल्या निर्मात्याची लाचारी असो वा चित्रपटात काम करू इच्छिणारी आणि आपल्या शरीराचे भांडवल घेऊन आलेली एखादी मुलगी असो) स्वतःसाठी वापर करून घेणारा धंदेवाईक व्यापारी होता. ' इतक्या चित्रपटांतून हिट झालेला सुपरस्टार; पण आपल्या बायकोशी किती एकनिष्ठ ! ' अशी स्वतःची एक आदरयुक्त प्रतिमा आपल्या चाहत्यांमध्ये निर्माण करण्यासाठी त्याने कल्पनाचा वापर केला. ही प्रतिमा टिकण्यासाठी कल्पनाने त्याची पत्नी म्हणून राहणे ही त्याची गरज होती. कल्पनाच्या घटस्फोट घेण्याच्या निर्णयाने महेन्द्र खवळला यात पुरुषी अहंकाराचा, विमलबद्दलच्या असूयेचा आणि स्वतःच्या अपमानाच्या भावनेचा भाग जरूर होता; पण त्याहीपेक्षा त्याची गरज आता अपुरी राहणार होती आणि त्यामुळे त्याला आलेल्या संतापाचे प्रमाण अधिक होते. महेन्द्रने कल्पनाला एक प्रदर्शनीय शोभेची वस्तू बनवून टाकले. त्याचे तिच्यावर प्रेम कधीच नव्हते आणि केवळ शारीरिक गरजेच्या पूर्तीबद्दल बोलायचे झाले तर त्यासाठी महेन्द्रला इतर अनेक दरवाजे उघडे होते.

या सगळ्याच गोष्टी रेखीवपणे उभ्या राहिल्यामुळे कल्पना आणि महेंद्र यांच्यातील संबंध फारच नेटके उभे राहिले आहेत.

तर अशी ही भरपूर पैलू लाभलेली स्वतःचीच कथा निर्माता–दिग्दर्शक विनोद पांडे यांनी निवडली. त्यांनी संपूर्ण चित्रपटात कथेच्या आशयाला साजेसाच हळुवार अविष्कार केला; पण हा आविष्कार फारच हळूही होता; त्यामुळेच चित्रपट आत्यंतिक संथ आणि कंटाळवाणा झाला आहे. प्रत्येक प्रसंगातून टिप-टिपून मांडलेले मनोविश्लेषण आणि प्रत्येक गोष्टीची हळूहळूवार केलेली उकलाउकली या दोन्हीमुळे प्रचंड लांबलेली अनेक दृश्ये यांच्या सगळ्यांचा संयुक्त कामगिरीतून चित्रपट कंटाळवाणा होत जातो. त्यामुळे पडद्यावर ही प्रीतिकथा उमलत असताना तिची तिसरी पाकळी उलगडण्यापूर्वी दुसरी सुकलेली असते आणि पहिली गळून गेलेली असते. विशेषतः ' मन कहे मैं झूमूं ' हे एक गीत वगळता अन्य दोन गीतांचे चित्रण म्हणजे या संथ अनावश्यक लांबीची परिसीमा होती. भूपेंद्रच्या अखेरच्या गीतात तर गीताच्या शेवटच्या कडव्यात कल्पना विमलच्या पाठीमागे येऊन थांबलेली असते (गाणे संपण्याची वाट बघत) आणि मग बऱ्याच वेळाने ते गाणे अखेर एकदाचे पूर्ण संपल्यावर ' साई सुट्टयो ' झाल्याप्रमाणे ती विमलला येऊन भेटते.

चित्रपटात अर्थातच सर्वात प्रभाव पाडते दीप्ती नवल. अत्यंत बोलके डोळे आणि लोभस चेहरा लाभलेल्या या अभिनेत्रीने कल्पनाची भूमिका अतिशय सुंदर साकारली. कॅमेरे चालू असताना स्वतःचा पदर सावरण्याची छोटीशी हालचाल असो, पार्टीमध्ये इतर स्त्रियांशी चाळे करणाऱ्या महेंद्रकडे टाकलेले असह्य रागाचे कटाक्ष असोत, लंडनमधील चित्रकलेच्या कॉलेजमध्ये प्रवेश केल्यानंतर भूतकाळातील आपल्या काही उच्छृंखल, काही नाविन्यपूर्ण फुलपाखरी कॉलेज-जीवनात रममाण झालेला अल्लडपणा असो वा विमलच्या प्रेमाला दिलेला भरभरून प्रतिसाद असो– कल्पनाच्या सगळ्याच छटा दीप्तीने अत्यंत जिवंत केल्या आहेत.


चित्रपटात महेंद्र उभा करणाऱ्या सुरेश ओबेरॉयचे कामही उत्तम झाले आहे. उंचीपुरी शरीरयष्टी आणि भरदार आवाज लाभलेल्या या नटाने चित्रपटसृष्टीतील चमकता तारा सफाईने उभा केलाच, शिवाय कल्पनाचा नवरा या नात्याने आधी उल्लेखिलेल्या महेंद्रच्या बाजूही सुरेख साकारल्या.

कलाकारांपैकी कल्पनाच्या भूमिकेत दीप्ती नवल, महेंद्रच्या भूमिकेत सुरेश ओबेरॉय आणि स्वतःलाच साकारणारा सईद जाफ्री हे तिघेजण वगळता बाकीचे लोक म्हणजे पडद्यावर दिसणारे मठ्ठ आणि मद्दड ठोकळे वाटतात. त्यांना फारसा कुठेच वाव नाही, या सबबीवर त्यांची ही ' असून अडचण, नसून घोटाळा ' स्थिती एक वेळ सहन केली तरी विमलच्या भूमिकेतील प्रदीप वर्माची अवस्थाही त्यांच्यापेक्षा फार वेगळी नाही.

चित्रपटाचे छायाचित्रकार नदीमखान. चित्रपटाचे संपूर्ण चित्रीकरण विदेशातच झाले आहे. इतके स्वच्छ आणि नजरेला सुखावणारे छायाचित्रण हिंदी चित्रपटांमध्ये अभावानेच आढळते. साध्या, छोटया खोलीमधील दिव्यांच्या रचनेमुळे वा उघडझाप करण्यामुळे होणाऱ्या छाया–प्रकाशाच्या खेळापासून ते कलाकारांचा बारीक–सारीक मुद्राभिनय टिपण्यापर्यंत सर्व गोष्टींमध्ये नदीमखान यांचा कॅमेरा समर्थपणे वावरला आहे. चित्रपटाच्या मूडला साजेसे भडकपणा संपूर्ण टाळून केलेले किंचित फिकट रंगातील हळूवार छायाचित्रण अगदी कॅमेरे आणि शयनदृश्यातील भडकपणाही अनुक्रमे लाचार प्रदर्शन आणि उत्कटतेच्या पातळीवर नेऊन ठेवते.

चित्रपटाचे गीतकार विनोद पांडे आणि संगीतकार रघुनाथ सेठ. ' मन कहे मैं झूमूं ' हे एकमेव द्वंद्वगीत वगळता अन्य दोन गीते शब्द आणि सूर म्हणून चांगली असूनही केवळ रटाळ आविष्कारामुळे प्रभावहीन ठरली. ' एक बार फिर ' मधील आधी उल्लेखलेल्या द्वंद्वगीतातून आणि ' जीवन एक सौदा है ' या गीतामधून अनुराधा या पार्श्वगायिकेचा विलक्षण प्रभाव पडला.

' एक बार फिर 'च्या संथपणाविषयी (खरे म्हणजे रटाळपणाविषयी) माझ्या एका मित्राची मल्लीनाथी– ' एक बार फिर हा चार बार फिर असल्याने तो प्रथम एका आड एक दृश्य असा कापावा आणि मग फिल्म दुप्पट वेगाने फिरवून दाखवावा. '



## पोलंड–गुंतागुंतीच्या रस्सीखेचीला सुरवात (पृष्ठ २ वरून)

ज्याच्या मुळापर्यंत न झिरपता सत्ताबदल वरच्यावर झाला, क्रांती झाली नाही.

त्यामुळे रशियामध्ये जशी Dual समाजव्यवस्था आज अस्तित्वात आली आहे, तशीच ती पोलंडमध्ये आली. रशियातही गॉर्कीमध्ये मोटारींच्या कारखान्यात नुकतेच संप झाले कामाझ येथील ट्रक्सचा कारखाना आणि चेलिबिन्स्क येथील ट्रॅक्टर्सचा कारखाना कामगारांनी बंद ठेवला होता. ही अस्वस्थता का यावी ? कामगारच ज्या राज्याचा शकट हाकत आहेत तेथे त्यानीच संपावर का जावे ? याचे उत्तर सत्ताधाऱ्यांच्या दृष्टिकोनात सापडेल.त्यांनी मोठमोठी आश्वासने देऊन परिपूर्ण समाजाची आलोभने दाखवली आणि कामगारांना कामास जुपले १९५६ सालापासून पोलंडमध्ये ही frenzy चालू होती. चीनमध्ये The Great Leap Forward च्या नावाखाली जसा गोंधळ झाला, तसा थोड्या–बहुत फरकाने सर्वच कम्युनिस्ट राजवटीत झाला. पण हा दोष मार्क्सवादातच अनुस्यूत (Inherent) आहे असे नाही. Marxian तत्वज्ञानात तो उद्भवत नाही. Marxism–Leninism–Stalinism किंवा Marxism–Leninism-Maoism या प्रमुख दोन Interpretations मधून अस्तित्वात आला.

उदाहरणार्थ, अफगाणिस्तानमध्ये रशियाने क्रांती झाल्याचे जाहीर करून तेथे आपले बाहुले बसवले, म्हणून अफगाणिस्तान कम्युनिस्ट होऊ शकत नाही, तो तथाकथित कम्युनिस्ट नियंत्रणाखाली आला एवढेच म्हणता येईल आणि आणखी दहा–बारा वर्षांनी तेथील शेतकऱ्यांनी – त्यांच्यावर मुल्लांचा पगडा आहे–राजवटीविरोधी आंदोलने परत सुरू केली, तर त्यासाठी त्या राजवटीच्या जन्माकडे पहावे लागेल. ज्या तत्त्वज्ञानाच्या नावाने ती राजवट चालू आहे, त्याला यासाठी जबाबदार धरता येणार नाही. कारण ते तत्त्वज्ञान तेथे रुजलेलेच नाही

' महाराष्ट्र टाईम्स'मध्ये मध्यंतरी चीनच्या अंतर्गत वस्तुस्थितीवर लेख आला होता. तेथे आता माओची पद्धतशीर नाचक्की चालू आहे. हुआ गुओ फॅगच्या जागी झान झिआओ हा तेंग सिआओ पेंगचा माणूस आलेला आहे. सांस्कृतिक क्रांतीच्या वेळी ज्यांना बदनाम करण्यात आले होते ती मंडळी एकापाठोपाठ एक परत सत्तास्थानांवर येत आहेत. आधुनिकीकरण आणि उत्पादन ही आता तेथील प्रमुख सूत्रे राहणार असे दिसते. पण या सर्व खांदेपालटाचा सामान्य माणसावर परिणाम काय ? तर त्यांच्याकडून अधिक त्यागाची अपेक्षा. चीनमधील एक पिढी माओने स्वत च्या कल्पनेतील चीन प्रत्यक्षात आणण्यासाठी वापरली, नव्या पिढीचा कोणीच प्रतिनिधिप्रमख सत्ताधारी दिसत नाही, मग त्यांच्या आशा-आकांक्षांची जाणीव राज्यकर्त्यांना कशी होणार ? परत अंतर्गत असंतोष–दडपशाही–आणखी असंतोष आणि मग परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊन भडका–हेच उद्भवणार ! पोलंडमध्ये सरकार गोंधळूनच गेले. नक्की काय करावे म्हणजे अन्नही वाचेल–असंतोषही शमेल ते कोणालाच कळेना आणि शेवटी कामगारांना स्वतंत्र संघटना स्थापन करण्याचा हक्क मिळाला. अर्थात चीनमध्ये दमनशाही अधिक बळकट आहे नुकत्याच झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या काँग्रेसने पेकिंगमधील लोकशाही भिंत मध्या तरी कोरीच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अलीकडेच प्रेस जरा सैल सोडण्यात आली होती, तीही पूर्वीसारखी काबूत आणण्यात आली आहे. पण या साऱ्या वरच्या नियंत्रणाचे वर्गपुनर्रचनेची प्रक्रिया थडावत नाही, त्यातून परत वर्गविग्रह अटळच राहणार

गांधी खून घटनेवर वेगळा प्रकाश




लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

याचे प्रमुख कारण म्हणजे आजच्या कोणत्याही कमुनिस्ट देशात Iron Curtain अभेद्य राहिलेला नाही. बाहेरच्या जगाच्या वार्ता या ना त्या स्वरूपात तेथील सामान्य माणसापर्यंत पोचतात. त्याना बंदी असल्याने त्या अधिकच भडक स्वरूपात पोचतात. त्यातून वाढत्या अपेक्षाची मालिका सुरू होते आणि कोणत्याही देशाला हा वाढत्या अपेक्षाचा प्रश्न जड जातो.

पोलंडचे सास्कृतिक महत्व अशासाठी की, भले तेथील रचना वैशिष्ट्यपूर्ण असो, टिपिकल कम्युनिस्ट (क्लासिकल नव्हे) देशात जे प्रश्न आज ना उद्या उद्भवणार आहेत, तेथे जो असंतोष खदखदत आहे, त्याला प्रथम दृश्य स्वरूपात इथे तोड फुटले. त्याचे परिणाम लगतच्या East block मध्ये होणे तर स्वाभाविकच आहे; पण कम्युनिस्टाखेरीजकरून इतर देशातही त्याचे पडसाद उमटल्याशिवाय राहणार नाहीत. याचे कारण, आज जगामध्ये कोणताही देश स्वतंत्रपण अस्तित्वात नाही ( in isolation ) संपूर्ण जागतिक संदर्भातच त्याचे भविष्य ठरते. फक्त स्थानिक गडबडीनी देशाचा चेहरा बदलू शकत नाही आणि यातूनच synthesis हा प्रश्न बिकट बनतो. मागील लेखात state thesis बनते तेव्हा antithesis without state कसा जन्माला येतो, त्याचे पोलंड हे उदाहरण आहे असे मी म्हटले होते पण पोलंडची या प्रक्रियेतील प्रमुख भूमिका इथवरच सपते. synthesis ची प्रक्रिया त्याच्या ताकदीबाहेर आहे. कारण synthesis मध्ये फक्त पोलंड निर्णायक घटक नाही, रशिया आहे आणि बाहेरचे जग आहे. रशियाचा प्रमुख प्रश्न अफगाणिस्तान आणि देशातर्गत असंतोष रशियाबरोबरच इतर युरोपियन व कम्युनिस्ट देशही या ना त्या प्रकारे पोलंडशी संलग्न आहेत.

त्यांची synthesis मध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भागिदारी रहाणार आहे. या देशामध्ये Marxian समाजरजना नाही. तशी असू शकते हा केवळ academic प्रश्न असेलही, पण पोलडवर रदूगामी परिणाम करू शकणाऱ्या देशाचा दृष्टिकोन तसा नाही हे निश्चित. रशिया व त्याच्या बच्च्याची अर्थव्यवस्था आहेत ते प्रश्न सोडविण्याऐवजी अधिक प्रश्न का निर्माण करते ? शस्त्रनिर्मिती हा पूर्णत: अनुत्पादक खर्च या सर्व देशात आहे. त्यामुळे वाढत्या अपेक्षांना अंशत:ही उत्तर देता येत नाही. मागणी आणि पुरवठा यातील संतुलन आपोआपच बिघडत जाते आणि वर्गभेद अधिक तीव्र होत जातात. सत्ताधारी, हा एक वर्ग, शासन हा दुसरा आणि उरलेला हा तिसरा हे तीन वर्ग कम्युनिस्ट देशात निर्माण होतात. State चे भवितव्य व निश्चित दिशा तर दूरच, पण dynamic equilibrium ही प्रस्थापित होऊ शकत नाही.

म्हणून पोलंड हे निमित्तमात्र असले, तरी या सर्व अंमळ गुतागुतीच्या स्तोखेची तेथील उद्रकाच्या मागे आहेत आणि ही तर फक्त सुरुवात आहे.

—चंद्रशेखर पुरंदरे

# आभार

खालील व्यक्ती आणि संस्था यांनी 'माणूस' साप्ताहिक व राजहंस प्रकाशन यांजकडे दिवाळीनिमित्त शुभचिंतन पत्रिका पाठविल्या. या सर्व व्यक्ती व संस्था यांचे 'माणूस' परिवारातर्फे आभार.

१ : पारिजात पब्लिकेशन्स, पुणे
२ : दायमा बुक स्टॉल, पाथर्डी.
३ : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, महाराष्ट्र प्रात, मुबई.
४ : शरद पवार व सौ. प्रतिभा पवार, मुबई.
५ : गोपालजी ठक्कर, पुणे.
६ : सुहास डासाळकर, कोल्हापूर.
७ : विष्णु पंड्या, अहमदाबाद.
८ : डी. जी. गुप्ते. व सौ. कुमुद घुप्ते, मुबई.
९ : श्याम भिडे, डोबिवली.
१० : साज तरुण भारत, मुंबई.
११ : मनोहर कुलकर्णी, नासिक.
१२ : एस. टी. शाह, औरंगाबाद.
१३ आयज् ॲडव्हर्टायझिंग, पुणे.
१४ : शरद जोशी, डोबिवली.
१५ : मुकुद गोसावी, मिरज.
१६ : इंटरनॅशनल सर्व्हिसेस, पुणे.
१७ : विनया खडपेकर, मुबई.
१८ : रा. भ. गौरकर, बार्शी.
१९ : सेंट्रल बॅक ऑफ इंडिया, नासिक.
२० : अविनाश आपटे, श्रीरामपूर.
२१ : ओमझिडक, मुबई.
२२ दैनिक साज समाचार, पुणे.
२३ : कलाभुवन, पुणे.
२४ : मु. ल. सोमण, मुबई.
२५ : आनंद बागलकोटे, मिरज.
२६ : नारायण भावे, पिंपरी.
२७ : वसंत निगवेकर, नागपूर.
२८ : खाडिलकर प्रीसेस स्टुडिओ, पुणे.
२९ :काशिनाथ बालाशा गुजराथी ॲंड सन्स, शहापूर.
३० : जे. एल. बाबळे, डोबिवली.
३१ : उत्तम जाहिरात वितरक, पुणे.
३२ : प्रभाकर गद्रे व सौ. आशा गद्रे, मुबई.
३३ : एन. बी. देव व डी. एन. देव, पुणे.

□

"Start where You are,
With what You have.
Make Something of it
Never be satisfied."

*-G. W. Carver*

गेल्या वर्षीच्या माणूस दिवाळी अंकात आलेली–गाजलेली चरित्र कहाणी

# एक होता कार्व्हर

लेखिका : सौ. वीणा गवाणकर.

लवकरच पुस्तकरूपात प्रसिद्ध होत आहे.

राजहंस प्रकाशन, पुणे ३०